


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २८५ * नांदेड * सोमवार, दि. २६ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## युरोपमध्ये लोकांच्या उद्रेकाचा भडका

### लुटालूट, हिंसाचार अन् शेकडोंच्या अटकेने फ्रान्स, इटलीसह अनेक देशांत हाहाकार



**मुंबई (प्रतिनिधी)–** फ्रान्सची राजधानी पॅरिस आणि तिराना शहरांच्या गल्ल्यांपासून ते माद्रिद, रोम आणि लिस्बनपर्यंत संपूर्ण युरोपमध्ये सध्या आंदोलनांची आणि हिंसक निदर्शनांची तीव्र लाट पाहायला मिळत आहे. गगनाला भिडलेली महागाई, घरांचे वाढते दर, सरकारी धोरणे आणि अनेक सामाजिक मुद्द्यांवरून नागरिकां-मध्ये निर्माण झालेला प्रचंड असंतोष आता रस्त्यावर उतरला आहे. फ्रान्स, इटली, अल्बानिया, स्पेन आणि पोर्तुगाल यांसारख्या युरोपियन देशांमध्ये आंदोलक आणि पोलिसांमध्ये हिंसक चकमकी घडल्या असून, परिस्थिती नियंत्रणात आणताना प्रशासनाची मोठी तारांबळ उडत आहे.

रॉयटर्सच्या अहवालानुसार, फ्रान्सचे गृहमंत्री लॉरेंट नुनेज यांनी दिलेल्या माहितीनुसार, देशभरात सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान पोलिसांनी सुमारे १,००० जणांना अटक केली आहे. काळे कपडे परिधान केलेल्या उग्र आंदोलकांकडून मोठ्या प्रमाणावर हिंसाचार करण्यात आला. गृह मंत्रालयाच्या माहितीनुसार, शनिवारी (२४ ऑक्टोबर) देशभरात सुमारे ४.१० लाख लोकांनी आंदोलनात भाग घेतला, ज्यामध्ये १.१० लाख लोक एकट्या पॅरिसमध्ये होते. तर युनियनच्या मते ही संख्या तब्बल ८ लाख इतकी होती.

अल्बानियाची राजधानी तिराना येथे शनिवारी हजारो नागरिक सरकारविरोधी आंदोलनात सहभागी झाले. परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याने पोलिसांनी जमावाला पांगवण्यासाठी अश्रूधुराचा वापर केला आणि रबर बुलेट चालवल्या.

## एकनाथ शिंदेंचा गळा इतका नाजूक नाही की कुणी केसाने कापेल

### केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधवांनी भाजपला सुनावलं!



**मुंबई (प्रतिनिधी)–** दीड वर्षांपूर्वीची क्लिप विधान परिषद निवडणुकीच्या एक दिवस आधी बाहेर काढण्यात मनोज जरांगेंचा हेतू काय? याची चौकशी झाली पाहिजे. अशी मागणी केंद्रीय राज्यमंत्री आणि शिवसेनेचे नेते प्रतापराव जाधव यांनी केली आहे. एकनाथ शिंदे हे सुद्धा मराठा समाजाचं एक मोठं नेतृत्व आहे. आम्ही विदर्भातील ९९% मराठा-ओबीसी असतानाही आम्ही जरांगेंच्या आंदोलनाला विरोध न करता पाठिंबा दिला आहे. त्यात आमच्याही मुलाबाळांचं नुकसान आहे. कारण ओबीसींची संख्या वाढली तर विदर्भातील आमच्याही पोराबाळांना नुकसान होऊ शकतं, मात्र सामाजिक बांधिलकी म्हणून आम्ही जरांगेंच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. आम्ही ओबीसी असतानाही कधी विरोध केला नाही, असेही प्रतापराव जाधव म्हणाले. तर एकनाथ शिंदे यांचा गळा इतका नाजूक नाही की, तो कुणी केसाने कापेल. जे काही चाललं आहे ते चांगलं नाही, असेही ते म्हणाले.

आम्ही ५० लोकांनी भाजपला मदत केली म्हणून भाजप सत्तेत आली. एकनाथ शिंदेंनी ती हिंमत केली नसती तर भाजपला सत्ता दिसली नसती. भाजपने महाराष्ट्रात कमी आमदार असून मुख्यमंत्री केलं नाही. तर बिहारमध्येही कमी आमदार असूनही नितीश कुमार यांना मुख्यमंत्री केलं. जर प्रवीण दरेकरांना आक्षेप घ्यायचा असेल तर त्यांनी एनडीएच्या नेत्यांवर व त्यांच्या निर्णयावर आक्षेप घ्यावा. मात्र एकनाथ शिंदे यांचा गळा इतका नाजूक नाही की, तो कुणी केसाने कापेल.

## अर्थखातं मिळविण्यासाठी राष्ट्रवादीचे मंत्री एकवटले

### सुनेत्रा पवारांच्या बैठकीनंतर मुख्यमंत्र्याची भेट

**मुंबई (प्रतिनिधी)–** गेल्या काही दिवसांमध्ये राज्याच्या राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला असून, अजित पवारांच्या राष्ट्रवादीने बैठकांचा सपाटा लावला आहे. काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार आणि खासदार पार्थ पवार यांनी दिल्लीत अमित शाह यांची भेट घेतली होती. त्यानंतर आज सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' निवासस्थानी बैठक पार पडली आहे.

दिवसभरातील राष्ट्रवादीच्या नेत्यांची ही दुसरी बैठक असून, अर्थखात्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते मुख्यमंत्र्यांच्या भेटीला गेले होते. 'वर्षा' निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बैठक संपल्यानंतर पक्षातील ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ आणि जय पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी या बैठकीत काय झाले, कोणत्या मागण्या होत्या आणि काय चर्चा झाली, याबाबत त्यांनी सविस्तरपणे माहिती दिली. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा आमच्याकडून पूर्णतः बंद आहेत, आम्ही कधीही भेटण्यासाठी वेळ मागितलेली नाही असंही छगन भुजबळ यांनी स्पष्ट केलं आहे. राष्ट्रवादीच्या वाट्याचं अर्थखातं आम्ही मुख्यमंत्र्यांकडे मागितलं पण ते अर्थखातं देण्याबाबत सकारात्मक आहे, पण खातं देण्याची तारीख मुख्यमंत्र्यांनी सांगितलेली नाही, असं देखील छगन भुजबळ म्हणालेले आहेत.

छगन भुजबळ यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना स्पष्ट केले की, सुनेत्राताई पवार ह्या आमच्या पक्षाच्या नेत्या, उपमुख्यमंत्री आहेत, आणि त्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' बंगल्यावर गेलो होतो. परंतु, काही ठिकाणी ज्या अशा बातम्या येतात की, ५ मंत्री जाणार आहेत, मर्ज होणार आहे, यात काहीही तथ्य नाही. अशा कुठल्याही प्रकारची चर्चा झालेली नाही. त्यामुळे चुकीच्या बातम्या कोणी चालवत असतील तर त्या दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. आमचं हक्काचं ते खाते आहे. ते परत देणार होते. मुख्यमंत्री यांनी सकारात्मकता दाखवली आहे. अमित शाह यांनी पूर्णपणे स्वातंत्र्य जे आहे ते मुख्यमंत्र्यांना दिले आहे. त्यामुळे नक्कीच सकारात्मक विचार आमचा होईल, आम्हाला अर्थ खाते पाहिजेच आहे, हिवाळी अधिवेशनाच्या आधी आम्हाला खातं मिळेल असं वाटतं, इतर कुठलेही खाते अदलाबदल होणार नाही, असंही भुजबळांनी स्पष्ट केलं आहे.

## १ नोव्हेंबर रोजी नवी दिल्लीत विरोधी पक्षाकडून रॅलीचे आयोजन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** आमची मते चोरली जात आहेत आणि आम्ही हे कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही, असा इशारा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देताना चलो दिल्लीचा नारा दिला आहे. राहुल गांधी यांनी सोशल मीडिया पोस्ट करताना रामलीला मैदानातील रॅलीला उपस्थित राहण्याचं आवाहन झालं आहे. राहुल यांनी सांगितले की, ज्यांनी प्रश्न विचारले त्यांच्यावर लाठीचार्ज करण्यात आला. विद्यार्थी, शेतकरी, मजूर, महिला, तरुण आणि व्यावसायिकांनी १ नोव्हेंबर रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर होणाऱ्या विरोधी पक्षाच्या सभेला उपस्थित राहावे.

हरियाणा काँग्रेसचे प्रभारी संजय दत्त आणि प्रदेशाध्यक्ष राव नरेंद्र सिंह यांनी दावा केला की, पक्षाच्या सभेला १० लाखांहून अधिक लोक उपस्थित राहतील. दरम्यान, चेंबर ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्रीने (सीटीआय) शनिवारी राहुल यांना इंडिया ब्लॉक रॅली पुढे ढकलण्याचे आवाहन केले. या संघटनेने दिवाळीच्या सणासुदीच्या काळात १० हजार कोटी रुपये व्यावसायिक नुकसान होणार असल्याचा दावा केला आहे.

राहुल यांनी रामलीला मैदानावरील रॅलीचे आवाहन करताना भाजप आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले, जे इतक्या उत्साहाने या कार्यक्रमाचा प्रचार करत आहेत आणि जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचत आहेत, असा टोला त्यांनी लगावला.

दरम्यान, विरोधी पक्षांनी मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या विरोधात सहा सभा आणि आंदोलने केली आहेत. इंडिया ब्लॉक नेत्यांनी ६ ते १३ ऑक्टोबर दरम्यान मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आठ आंदोलने केली. सीजेपी आणि डाव्या पक्षांनीही १० ऑक्टोबर रोजी याच मुद्द्यावर आंदोलनाची हाक दिली होती, परंतु दिल्ली पोलिसांनी परवानगी नाकारली. या काळात शहरात बॅरिकेड्स लावण्यात आले, ४५ मेट्रो स्टेशन बंद करण्यात आली आणि ७ हजारहून अधिक आंदोलकांना ताब्यात घेण्यात आले.

## 'मन की बात'ला १२ वर्षे पूर्ण

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रिय 'मन की बात' या कार्यक्रमाला १२ वर्षे पूर्ण झाली आहेत. विजया-दशमीच्या मुहूर्तावर सुरू झालेल्या या प्रवासाला १२ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त, पंतप्रधान मोदींनी 'मन की बात'च्या १३९ व्या भागातून देशवासीयांशी संवाद साधला. हा प्रवास आणि देशातील लोकांच्या योगदानाला वंदन करणे हा माझ्यासाठी तीर्थयात्रेइतकाच पवित्र अनुभव असल्याचे त्यांनी सांगितले.

येत्या सण-उत्सवांच्या काळात कुटुंबीयांसाठी खरेदी करताना स्थानिक कारागिरांनी तयार केलेल्या वस्तूंना प्राधान्य द्यावे, असे आवाहन पंतप्रधानांनी केले आहे.

## आठ हजारांच्या कर्जासाठी चाळीस हजारांची मागणी; शेतकऱ्याच्या हत्येप्रकरणी फायनान्स कंपनीशी संबंधित तिघे पोलिसांच्या ताब्यात

### माळकौठ्यातून अपहरण करून दोन दिवस डांबून ठेवल्याचा आरोप; मारहाणीत शेतकऱ्याचा मृत्यू, वजिराबाद पोलिसांत खुनाचा गुन्हा

**नांदेड (प्रतिनिधी)–** अवघ्या आठ हजार रुपयांच्या कर्जाच्या वसुलीसाठी ४० हजार रुपयांची मागणी करून शेतकऱ्याला डांबून ठेवल्याच्या आणि मारहाण केल्याच्या आरोपातून नांदेडमध्ये खळबळजनक हत्येचे प्रकरण समोर आले आहे. माळकौठा (ता. मुदखेड) येथील शेतकरी चंद्रकांत दगडूजी शिंदे (वय ४०) यांचा हिंगोली गेट ब्रिजजवळील खालसा फायनान्स कार्यालयात मृतदेह आढळला. या प्रकरणी फायनान्स कंपनीशी संबंधित तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मृत शेतकऱ्याची पत्नी ज्योती शिंदे यांच्या फिर्यादीनुसार, २२ ऑक्टोबर रोजी माळकौठा येथील मारुती मंदिराजवळून चंद्रकांत यांना जबरदस्तीने दुचाकीवरून नांदेड येथील फायनान्स कार्यालयात नेण्यात आले. तेथे दोन दिवस डांबून ठेवून मारहाण केल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

याप्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५३३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), १४०(१), १४०(२), १४२, १२७(२) आणि ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जयकुमार उर्फ शेरा भगवान गायकवाड (२२), शेख आमेर शेख साहेबहुसेन (२५) आणि इम्रान खान शाहबाज खान (४०) या तिघांना ताब्यात घेण्यात आले असून, इतर संबंधितांचा शोध सुरू आहे.

दरम्यान, कर्जवसुलीच्या नावाखाली धमकी किंवा बेकायदेशीर त्रास दिल्यास नागरिकांनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा किंवा ११२ या आपत्कालीन क्रमांकावर माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. पुढील तपास वजिराबाद पोलीस करीत आहेत.

### जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा फायनान्स कंपन्यांना कडक इशारा

## कर्जवसुलीसाठी सक्ती केली तर थेट फौजदारी गुन्हा!

### शेतकऱ्याच्या मृत्यूनंतर प्रशासन खडबडून जागे; मायक्रो फायनान्स चालकांची तातडीची बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील खालसा फायनान्स कंपनीच्या कार्यालयात माळकौठा येथील शेतकरी चंद्रकांत शिंदे यांचा मृतदेह आढळल्याच्या घटनेनंतर जिल्हा प्रशासन खडबडून जागे झाले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी रविवारी जिल्ह्यातील सर्व मायक्रो फायनान्स व स्मॉल फायनान्स कंपन्यांच्या चालकांची तातडीची बैठक घेतली.

या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी फायनान्स चालकांना कडक शब्दात इशारा दिला. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी व अन्य कर्जदारांकडून कर्जवसुली करताना कोणत्याही प्रकारची सक्ती, धमकी किंवा बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करू नये, अन्यथा संबंधितांवर थेट फौजदारी कारवाई करण्यात येईल, असे निर्देश त्यांनी दिले.

दुष्काळी परिस्थितीत शेतकरी व कर्जदार आर्थिक अडचणींचा सामना करीत असताना वित्तीय संस्थांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कर्जवसुलीसाठी मानसिक त्रास देणे, अपमानास्पद वागणूक देणे, धमकावणे, हिंसाचार करणे, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींचा वापर करणे तसेच सिबिल स्कोअर खराब करण्याची भीती दाखवून दबाव आणणे, अशा बेकायदेशीर किंवा नियमबाह्य कृती कोणत्याही परिस्थितीत सहन केल्या जाणार नाहीत, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

शहरातील खालसा फायनान्सच्या कार्यालयात माळकौठा येथील शेतकरी चंद्रकांत शिंदे यांना किरकोळ कर्जासाठी पकडून आणून कार्यालयात डांबून ठेवल्याचा आरोप आहे. त्यानंतर ते गळफास लावलेल्या अवस्थेत मृत आढळले, यामुळे जिल्ह्यात तणाव निर्माण झाला होता.

स्मॉल फायनान्स, मायक्रो फायनान्स व इतर वित्तीय संस्थांकडून कर्जवसुलीच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास पोलीस प्रशासन व जिल्हा प्रशासनामार्फत संबंधितांवर कायद्यानुसार कठोर दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात येईल. यापुढे नियमबाह्य वसुलीच्या प्रकरणात कोणतीही पूर्वसूचना न देता कायदेशीर तरतुदींनुसार तातडीने कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही बैठकीत देण्यात आला.

## २७ ऑक्टोबरपासून रेल्वे प्रवाशांना विम्याचे कवच

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** २७ ऑक्टोबरपासून रेल्वे तिकीट बुकिंगचा एक नियम बदलणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, भारतीय रेल्वे एक मोठा बदल लागू करत आहे.

या अंतर्गत रेल्वे स्थानकावरील काउंटरवर तिकीट बुक करताना रेल्वे प्रवाशांना आता विमा संरक्षणाचा लाभही मिळेल. रेल्वे २७ ऑक्टोबरपासून काउंटरवरील रेल्वे तिकिटांवर विमा देणार आहे. आतापर्यंत, प्रवाशांना इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशनच्या वेबसाइट किंवा मोबाईल पवरून रेल्वे तिकीट बुक करताना रेल्वे प्रवास विमा निवडण्याचा पर्याय होता. पण आता ही सुविधा थेट रेल्वे काउंटरवरून तिकीट बुक करतानाही दिली जाईल.

## खा. अशोकराव चव्हाण यांनी घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट

### दुष्काळी उपाययोजनांसह अवैध सावकारीबाबत चर्चा
### काँग्रेस प्रवेशाच्या चर्चेवरून केली जोरदार टीका

**नांदेड (प्रतिनिधी)–** माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी रविवारी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांची भेट घेऊन दुष्काळी उपाययोजनांची अंमलबजावणी आणि अवैध सावकारीला आळा घालण्याबाबत चर्चा केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या भेटीप्रसंगी आ. अमरनाथ राजूरकर आणि माजी पालकमंत्री डी. पी. सावंत देखील उपस्थित होते. खा. अशोकराव चव्हाण यांनी यावेळी दुष्काळी उपाययोजनांसंदर्भात शेतकऱ्यांच्या विविध मागण्या जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडल्या. महावितरणने वीजपुरवठा खंडित केल्याने काही ठिकाणी पाणीपुरवठाही बाधित झाल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. गावकऱ्यांचा पाणीपुरवठाच बंद होईल, अशी कोणतीही वीज जोडणी खंडित करू नये, अशी सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केली.

माळकौठा येथील शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्याबाबत घडलेल्या घटनेची गंभीर दखल घ्यावी. तसेच, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीयीकृत व खासगी बँका, तसेच नोंदणीकृत फायनान्स कंपन्यांच्या सर्व प्रकारच्या कर्जवसुलीवर निर्बंध आणून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी आणि अनधिकृत पद्धतीने कर्जे देणाऱ्या व पठाणी वसुली करणाऱ्या सर्व मायक्रोफायनान्स कंपन्यांसह अवैध सावकारांवर कठोर कारवाई करावी, असेही खा. अशोकराव चव्हाण म्हणाले.

या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी काँग्रेस प्रवेशाच्या बातम्यांचे खंडन केले.




## सावकारांच्या छळाला घाबरू नका! शेतकऱ्यांच्या मृत्यूनंतर उमाप यांचा इशारा; बेकायदेशीर वसुली कराल तर जेलमध्ये जाल

### खालसा फायनान्स प्रकरणानंतर परिक्षेत्रात विशेष मोहीम

**नांदेड (प्रतिनिधी)–** कर्जाचा फास आवळून शेतकऱ्याच्या जीवावर उठणाऱ्या बेकायदेशीर सावकारांनो, आता सावध व्हा! शेतकऱ्यांच्या मानगुटीवर बसून अवाजवी व्याज, दमदाटी आणि मारहाण करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. अशा नराधमांविरुद्ध निर्भयपणे तक्रार करा, पोलीस तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत असा कडक इशारा नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दिला आहे.

वजिराबाद हद्दीतील खालसा फायनान्सच्या कार्यालयात कर्जवसुलीच्या नावाखाली माळकौठ्याच्या शेतकऱ्याला डांबून ठेवून संपवल्याच्या धक्कादायक घटनेनंतर जिल्हाभरात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेने पुन्हा एकदा बेकायदेशीर सावकारीचा किळसवाणा चेहरा समोर आणला आहे.



पिकं हातची गेली, निसर्गाने साथ सोडली म्हणून जीव द्यायचा का? कर्ज थकले म्हणून गुंड पाठवून धमकावणे, घरात घुसून अपमान करणे, डांबून ठेवणे हा कायदा नाही, हा गुन्हा आहे!

शेतकरी बांधवांनो, घाबरू नका. आत्महत्येचा विचारही मनात आणू नका. तुमच्याकडे कोणी अवाजवी व्याज मागत असेल, धमकी देत असेल, तर तडक जवळच्या पोलीस ठाण्यात या.

बेकायदेशीर सावकारीला बळी पडलेल्या प्रत्येक शेतकऱ्याने पुढे येऊन तक्रार नोंदवावी. तुम्ही एकटे नाहीत. तुमच्या तक्रारीची गोपनीयता राखली जाईल आणि तक्रारदाराला पूर्ण कायदेशीर संरक्षण दिले जाईल.

शेतकरी हा अन्नदाता आहे, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्याच्या असहायतेचा फायदा घेणाऱ्या सावकारी प्रवृत्तीला मुळापासून उखडून टाकण्यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध आहे. अन्याय सहन करण्यापेक्षा आवाज उठवा, कायदा तुमच्या सोबत आहे. यावेळी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, पोलीस निरीक्षक गणेश कराड, सकल मराठा समाजाचे श्याम वडजे पाटील उपस्थित होते.

## दिवाळीपूर्वी 'एफडीए'ची राज्यभर मोहीम, ६८ आस्थापनांचे परवाने निलंबित करत १६.१२ कोटींचा मुद्देमाल जप्त

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात सध्या एफडीएच्या कारवाईचं धाडसत्र सुरुच असून अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढेंच्या निर्देशान्वये भेसळयुक्त आणि अनियमितता आढळून आल्यास परवाने निलंबनाची देखील कारवाई होत आहे. अशातच आगामी दिवाळी आणि इतर सणांच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात एफडीएने 'फेस्टिव्ह क्रॅकडाउन' मोहीम राबवत धडक कारवाई सुरु केली आहे. नुकत्याच पार पडलेल्या नवरात्रोत्सवात एफडीएने राज्यभर धडक मोहीम राबवली असून, यात ९.११ कोटींचा निकृष्ट, भेसळयुक्त अन्नसाठा अन्न व औषध प्रशासन विभागाने या काळात जप्त केला आहे. तर नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा देखील यावेळी देण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगरमध्ये ४.१९ कोटींचा अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे. तर राज्यात ३.१५ कोटींचा गुटखा, पानमसाला आणि तंबाखू देखील जप्त करण्यात आल्याची माहिती आहे. यात ६८ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले असून ७ बंद करण्याचे निर्देश अन्नसाठा अन्न व औषध प्रशासन विभागाने दिले आहेत. तर या कारवाईत २२ गुन्हे दाखल करत २० आरोपींनाही अटक करण्यात आल्याची माहिती आहे. यासोबतच ८,३९२ किलो मुदतबाह्य, खराब आणि नाकारलेला अन्नसाठा देखील या कारवाईत जप्त करण्यात आलाय.

एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या सहाही विभागांत ही मोहीम राबविण्यात आली.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
**गोदातीर समाचार**
संपादक
केशव घोणसे पाटील

# शिक्षणाचा बाजार नव्हे, सार्वजनिक विश्वासाचा विषय!

शिक्षण ही सेवा आहे की व्यवसाय? हा प्रश्न भारतात गेल्या काही वर्षांत अधिक तीव्रतेने पुढे आला आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे भूछत्र आणि खासगी विद्यापीठांची वाढ यातून शैक्षणिक क्षेत्रातील अधोगतीचा पाया घातला गेला आहे. म्हणूनच अशा शैक्षणिक संस्थांमधून वाढते शुल्क, विविध नावांनी विद्यार्थ्यांकडून होणारी शुल्कवसुली आणि शिक्षणसंस्थांच्या आर्थिक व्यवहारांबाबत उपस्थित होणारे प्रश्न, या पार्श्वभूमीवर नुकतीच सर्वोच्च न्यायालयाने घेतलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. खासगी विद्यापीठांना नफा कमावणाऱ्या संस्था म्हणून चालविता येणार नाही, हे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले असून, देशभरातील खासगी विद्यापीठांच्या आर्थिक व्यवहारांची व्यापक तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. हा आदेश केवळ एखाद्या संस्थेपुरता मर्यादित नसून उच्च शिक्षणाच्या संपूर्ण व्यवस्थेला जबाबदारी आणि पारदर्शकतेचा आरसा दाखवणारा आहे. या आदेशानुसार मागील पाच वर्षांचे लेखापरीक्षित आर्थिक अहवाल, निधीचा वापर, विद्यार्थ्यांकडून वसूल केलेल्या शुल्काचा तपशील आणि अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीची माहिती तपासली जाणार आहे. याशिवाय केंद्र व राज्य सरकारकडून मिळालेली जमीन, विविध सवलती, विशेष सुविधा आणि अन्य लाभांचाही हिशेब द्यावा लागणार आहे. म्हणजेच खासगी विद्यापीठांना केवळ 'आम्ही स्वायत्त आहोत' या भूमिकेच्या आड आर्थिक व्यवहार लपविता येणार नाहीत. खासगी विद्यापीठांना वाजवी राखीव निधी ठेवण्यास न्यायालयाने हरकत घेतलेली नाही. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना योग्य वेतन देणे, विद्यापीठाचे नियमित कामकाज सुरळीत चालविणे यासाठी आर्थिक नियोजन आवश्यकच आहे. मात्र शिक्षणासाठी उपलब्ध आर्थिक साधने शिक्षणाशी संबंध नसलेल्या कामांसाठी वळविता येणार नाहीत, हा न्यायालयाचा स्पष्ट संदेश आहे. या एका निरीक्षणात शिक्षणव्यवस्थेतील आर्थिक शिस्तीचे मूलभूत तत्त्व दडलेले आहे. विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबतही पारदर्शकता आवश्यक आहे. प्रवेशाच्या वेळी किंवा अभ्यासक्रमादरम्यान आकारले जाणारे शुल्क, विकास निधी, विशेष कार्यक्रमांच्या नावाखाली घेतलेली रक्कम किंवा अन्य कोणत्याही नावाने वसूल केलेले पैसे, या प्रत्येक रकमेचा हिशेब स्पष्ट असला पाहिजे. पालक आणि विद्यार्थी लाखो रुपये खर्च करून उच्च शिक्षण घेत असतात. त्यामुळे त्यांनी भरलेल्या प्रत्येक रुपयाचा उपयोग नेमका कुठे होतो, हे जाणून घेण्याचा त्यांना अधिकार आहे. शिक्षणाच्या गुणवत्तेइतकाच शिक्षकांचा दर्जा आणि त्यांना मिळणारा मोबदलाही महत्त्वाचा आहे. म्हणूनच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती, त्यांचे वेतन, परीक्षा व्यवस्थापन आणि तक्रार निवारण यंत्रणेची माहिती मागविण्याचा न्यायालयाचा निर्णय महत्त्वपूर्ण ठरतो. गेल्या तीन वर्षांतील तक्रारी आणि त्यावर झालेली कारवाईही तपासली जाणार आहे. एखाद्या विद्यार्थ्याची तक्रार केवळ कार्यालयीन फाईलमध्ये बंद होऊन राहू नये; तिच्यावर निष्पक्ष आणि वेळेत कार्यवाही होणे ही संस्थेची जबाबदारी आहे. विशेष म्हणजे हे प्रकरण नोएडातील मिटी विद्यापीठाविरोधातील एका विद्यार्थिनीच्या तक्रारीतून सुरू झाले. मात्र सार्वजनिक हिताचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाने त्याची व्याप्ती देशभरातील खासगी विद्यापीठांच्या कार्यपद्धतीपर्यंत वाढविली. यामधून एक मूलभूत संदेश मिळतो की, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात संस्था खासगी असू शकते; परंतु विद्यार्थ्यांचे हित आणि सार्वजनिक उत्तरदायित्व खासगी होऊ शकत नाही. केंद्र सरकार, सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना माहिती गोळा करून प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नियामक संस्थांनाही मागील पाच वर्षांतील तपासणी आणि मान्यतेचा तपशील द्यावा लागणार आहे. त्यामुळे आता केवळ विद्यापीठांचीच नव्हे, तर त्यांच्यावर देखरेख ठेवणाऱ्या यंत्रणांची कार्यक्षमताही तपासली जाणार आहे. नियम असणे पुरेसे नाही; त्यांची अंमलबजावणी किती प्रभावीपणे झाली, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. खासगी विद्यापीठांना सरकारकडून जमीन, विविध सवलती किंवा अन्य सुविधा मिळत असतील, तर त्या बदल्यात सामाजिक आणि शैक्षणिक उत्तरदायित्वाची अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. सार्वजनिक संसाधनांचा लाभ घेणाऱ्या संस्थांनी सार्वजनिक हिताला प्राधान्य देणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या नावाखाली आर्थिक साम्राज्य उभे करण्याची प्रवृत्ती वाढत असेल तर तिच्यावर नियंत्रण ठेवणे ही सरकार आणि नियामक संस्थांची जबाबदारी आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशाकडे खासगी शिक्षण क्षेत्रावरील अविश्वास म्हणून पाहण्यापेक्षा पारदर्शक, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थी-केंद्रित उच्च शिक्षणाची गरज अधोरेखित करणारा हस्तक्षेप म्हणून पाहिले पाहिजे. देशाच्या भवितव्याची घडण ज्या विद्यापीठांत होते, तेथे आर्थिक व्यवहारांपासून प्रवेशप्रक्रियेपर्यंत प्रत्येक पायरी स्वच्छ आणि उत्तरदायी असली पाहिजे. शिक्षणाच्या दालनात ज्ञानाला केंद्रस्थानी ठेवायचे की नफ्याला, हा मूलभूत प्रश्न आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. केवळ आर्थिक हिशोबच नव्हे तर खाजगी विद्यापीठांनी शिक्षणाचा कोणता दर्जा राखला आहे याचे देखील ऑडिट झाले पाहिजे. थातूरमातूर कॉपी आणि पेस्ट पद्धतीने संशोधन होत असल्यास अशा विद्यापीठांना दिलेली मान्यता रद्द करणे जास्त योग्य आहे. कारण यामुळे केवळ विद्यापीठाचे नाव बदनाम होते असे नव्हे तर देशाच्या प्रतिमेवर देखील त्याचा परिणाम होतो. म्हणूनच आता सरकार, नियामक संस्था आणि खासगी विद्यापीठांनी त्या भूमिकेचे गांभीर्याने पालन करणे अपेक्षित आहे. शिक्षणाचा विस्तार झाला पाहिजे; शिक्षणाचा बाजार मात्र वाढता कामा नये.

# महागाईचा आगडोंब; सर्वसामान्यांचे जगणेच महाग!



दुष्काळाची भीती, विस्कळीत पुरवठा आणि सणासुदीची वाढती मागणी यांचा एकत्रित परिणाम अन्नधान्य, डाळी आणि भाजीपाल्याच्या दरांवर होत आहे. मात्र, या महागाईची सर्वाधिक झळ बसत आहे ती मर्यादित उत्पन्नात संसाराचा गाडा ओढणाऱ्या कुटुंबांना. पोटाची भूक भागवण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तूच आवाक्याबाहेर जाऊ लागल्या, तर सामान्य माणसाने जगायचे कसे, हा प्रश्न अधिक गंभीर बनतो.

महागाई हा केवळ बाजारभावांचा आकड्यांशी संबंधित विषय नाही; तो सामान्य माणसाच्या जगण्याशी, त्याच्या आर्थिक स्वातंत्र्याशी आणि कुटुंबाच्या भविष्याशी जोडलेला प्रश्न आहे. सध्या देशातील आणि राज्यातील अन्नधान्य, डाळी, तांदूळ, खाद्यतेल आणि भाजीपाल्याच्या दरांमध्ये होत असलेली वाढ पाहता सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघराचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडण्याची चिन्हे दिसत आहेत. दुष्काळाची भीती, पिकांच्या उत्पादनातील संभाव्य घट आणि सणासुदीच्या काळातील वाढती मागणी या घटकांनी महागाईच्या आगीत तेल ओतले आहे. परिणामी, बाजारपेठेत खरेदीसाठी जाणाऱ्या ग्राहकांच्या खिशाला मोठी कात्री लागत आहे.

दुष्काळ हा निसर्गनिर्मित असला, तरी त्याचे आर्थिक परिणाम किती तीव्र होतील, हे बऱ्याच अंशी सरकारचे नियोजन, बाजारव्यवस्थेची कार्यक्षमता आणि वितरण यंत्रणेवरील नियंत्रण यांवर अवलंबून असते. पाऊस कमी झाला, खरीप हंगामातील पिके वाळली आणि रब्बीच्या पेरणीवरही संकट आले, तर अन्नधान्याचा पुरवठा कमी होण्याची भीती रास्त आहे. मात्र, या परिस्थितीचा फायदा घेऊन बाजारात कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असेल किंवा साठेबाजी व नफेखोरी होत असेल, तर त्याचा सर्वाधिक फटका ग्राहकांना बसतो. त्यामुळे दुष्काळाच्या संकटाकडे केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून न पाहता त्याच्या आर्थिक आणि सामाजिक परिणामांचाही गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

डाळी आणि कडधान्ये ही भारतीय आहारातील प्रथिनांची महत्त्वाची साधने आहेत. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि मध्यमवर्गीय कुटुंबांच्या आहारात डाळींचे महत्त्व मोठे आहे. मात्र, महिनाभरात डाळी आणि कडधान्यांच्या दरांत १० ते १५ टक्क्यांची वाढ झाल्याचे चित्र आहे. काही डाळींच्या किमती प्रतिकिलो १० ते २० रुपयांनी वाढल्याने रोजच्या जेवणाचा खर्च वाढला आहे. खरीप हंगामातील मूग, उडीद आणि तूर या पिकांच्या उत्पादनात मोठी घट होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. उत्पादन कमी झाले आणि मागणी कायम राहिली, तर दर आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तांदळाच्या बाजारातील परिस्थितीही चिंताजनक आहे. कोकणासह महाराष्ट्रातील अनेक भागांत तांदूळ हा दैनंदिन आहाराचा अविभाज्य घटक आहे. अशा परिस्थितीत आंबेमोहोर तांदळाचे दर प्रतिकिलो १९० ते २०० रुपयांपर्यंत पोहोचणे, तर कोलम तांदळाचे दर ७० ते १२० रुपयांच्या आसपास जाणे, ही सामान्य ग्राहकांसाठी मोठी आर्थिक झळ आहे. पूर्वी ज्या पैशांत कुटुंबाची आठवडाभराची धान्यखरेदी होत असे, त्याच रकमेत आता कमी वस्तू खरेदी कराव्या लागत आहेत. गहू आणि खाद्यतेलाच्या दरांमध्येही वाढीचा कल दिसू लागला, तर घरखर्चावरचा ताण आणखी वाढणार आहे.

महागाईची टक्केवारी अर्थशास्त्राच्या भाषेत मोजली जाते; परंतु तिचा खरा परिणाम घरातील खर्चाच्या वहीत दिसतो. निश्चित पगार असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे उत्पन्न दरमहा ठरावीक असते. शेतमजूर, रोजंदारीवर काम करणारे कामगार, छोटे व्यावसायिक आणि असंघटित क्षेत्रातील कामगार यांचे उत्पन्न तर अनेकदा अनिश्चित असते. अशा कुटुंबांसाठी अन्नधान्याच्या किमतीत झालेली छोटी वाढदेखील मोठे संकट ठरू शकते. कारण उत्पन्न वाढण्याचा वेग आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढण्याचा वेग यांत तफावत असते. महागाई वाढली की कुटुंबे सर्वप्रथम अनावश्यक खर्च कमी करतात. त्यानंतर कपडे, शिक्षण, आरोग्य तपासणी, प्रवास आणि मनोरंजन यांसारख्या खर्चांवर मर्यादा आणल्या जातात. काही कुटुंबे मुलांच्या पोषणाकडे दुर्लक्ष करतात, तर काही आजारपणात उपचार पुढे ढकलतात. म्हणजेच अन्नधान्याच्या दरवाढीचे परिणाम केवळ बाजारपेठेपुरते मर्यादित राहत नाहीत; ते शिक्षण, आरोग्य आणि जीवनमानावरही होतात. महागाईचा सर्वांत मोठा अन्याय हाच की, तिचा भार उत्पन्नानुसार समान प्रमाणात पडत नाही. श्रीमंत व्यक्तीच्या खर्चात अन्नधान्याचा वाटा कमी असतो, तर गरीब कुटुंबाच्या एकूण उत्पन्नाचा मोठा भाग अन्नावर खर्च होतो.

दसरा, दिवाळी आणि नवरात्रोत्सव हे आनंदाचे, परंपरेचे आणि सामाजिक एकोप्याचे सण आहेत. मात्र, सणासुदीच्या काळात बाजारपेठेतील मागणी वाढली की अनेक वस्तूंचे दर चढतात. घरातील पूजासाहित्य, उपवासाचे पदार्थ, फळे, भाजीपाला, कपडे आणि मिठाई यांच्या खरेदीचा खर्च वाढतो. अशा वेळी अन्नधान्य आणि रोजच्या स्वयंपाकातील वस्तूही महाग झाल्या, तर सण साजरा करण्यासाठी सामान्य माणसाला अतिरिक्त आर्थिक ताण सहन करावा लागतो. सणांच्या काळात मागणी वाढणे स्वाभाविक आहे. मात्र, मागणी वाढली म्हणून जीवनावश्यक वस्तूंचे दर अनियंत्रितपणे वाढणे अपरिहार्य नाही. बाजारात पुरेसा पुरवठा उपलब्ध करून देणे, साठेबाजी रोखणे आणि किरकोळ विक्रीतील अवाजवी दरवाढीवर लक्ष ठेवणे, ही प्रशासनाची जबाबदारी आहे. सणांच्या नावाखाली ग्राहकांची आर्थिक पिळवणूक होत असेल, तर त्याला आळा घालण्यासाठी प्रभावी यंत्रणा कार्यरत असली पाहिजे. महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी तात्पुरत्या घोषणांपेक्षा समन्वित आणि दूरदृष्टीपूर्ण उपायांची आवश्यकता आहे. केंद्र आणि राज्य सरकारने संभाव्य उत्पादनघटीचा अंदाज घेऊन अन्नधान्याच्या उपलब्धतेचे नियोजन करावे. आवश्यकतेनुसार सरकारी साठ्यातील धान्य बाजारात उपलब्ध करून देणे, डाळींचा पुरवठा वाढवणे, आयातीचे वेळेवर नियोजन करणे आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेची कार्यक्षमता वाढवणे, अशा उपायांचा विचार केला पाहिजे.

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना पीकविमा, नुकसानभरपाई, पाणी उपलब्धता आणि रब्बी हंगामासाठी आवश्यक मदत वेळेत मिळणेही महत्त्वाचे आहे. कारण शेतकऱ्याचे नुकसान आणि ग्राहकाची महागाई हे परस्परांपासून पूर्णपणे वेगळे प्रश्न नाहीत. उत्पादन घटले की शेतकऱ्याचे उत्पन्न कमी होऊ शकते आणि बाजारातील पुरवठा घटल्याने ग्राहकाला अधिक पैसे मोजावे लागू शकतात. त्यामुळे पाणी व्यवस्थापन, सूक्ष्म सिंचन, पीकविविधीकरण, स्थानिक साठवण व्यवस्था आणि शेतमाल वितरणातील पायाभूत सुविधा यांमध्ये दीर्घकालीन गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

किरकोळ महागाईचा दर किती टक्के आहे, यावर आर्थिक परिस्थितीचे मूल्यमापन केले जाते. मात्र, सर्वसामान्य ग्राहकाला महागाईचा अनुभव त्याच्या रोजच्या खरेदीतून येतो. एकीकडे उत्पन्न मर्यादित आणि दुसरीकडे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढत असतील, तर अधिकृत आकडेवारीतील सरासरी दर त्याच्या अडचणींचे पूर्ण चित्र दाखवू शकत नाही. म्हणूनच महागाईचे मूल्यमापन करताना केवळ निर्देशांकाकडे न पाहता गरीब, शेतकरी, कामगार, महिला आणि मध्यमवर्गीय कुटुंबांच्या प्रत्यक्ष खर्चाचाही विचार झाला पाहिजे. दुष्काळाचे संकट गंभीर आहे आणि त्याचा परिणाम शेती उत्पादनावर होण्याची शक्यता आहे. परंतु या संकटाचे रूपांतर सर्वसामान्यांच्या अन्नसुरक्षेच्या प्रश्नात होऊ नये, यासाठी सरकार आणि प्रशासनाने वेळेत पावले उचलली पाहिजेत. महागाई वाढल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा संभाव्य टंचाईचा अंदाज घेऊन आधीच तयारी करणे अधिक परिणामकारक ठरते. शेवटी, अन्नधान्य ही चैनीची वस्तू नाही; ती जगण्यासाठीची मूलभूत गरज आहे. पोटभर आणि पोषक अन्न मिळणे हा प्रत्येक नागरिकाच्या सन्मानाने जगण्याचा प्रश्न आहे. बाजारातील तेजी-मंदीच्या चर्चेपलीकडे जाऊन सामान्य माणसाच्या ताटातील अन्न परवडणारे राहील, याची खात्री करणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. दुष्काळाचा धसका आणि महागाईचा तडाखा यांचा दुहेरी भार सामान्य जनतेवर पडू नये, यासाठी तातडीच्या उपायांसोबतच दीर्घकालीन नियोजनाचीही गरज आहे. अन्यथा, महागाई केवळ खिशाला कात्री लावणार नाही, तर सामान्य माणसाच्या जगण्यातील आनंद, सुरक्षितता आणि भविष्याविषयीची आशाही कमी करेल.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि. सांगली



# जीवन एक मैफील

चार घडीचा डाव, याला जीवन ऐसे नाव...याप्रमाणे खरोखर आपले जीवन हे अत्यंत कमी कालावधीचे असते. पाहता पाहता आयुष्याचे दिवस सरून जातात. आजाणतेपणामध्ये बालपण संपते...स्वप्नाप्रमाणे तरुणपण संपून जाते...विविध गोष्टींच्या भुरळीमधून बाहेर पडल्यानंतर...लख्ख आणि स्वच्छ प्रकाशाप्रमाणे प्रौढत्व आयुष्यात येते. याच काळात जर आपण समजून, उमजून राग, लोभ, द्वेष, मत्सर आणि अहंकार यासारखे सर्व विकार सोडून जमेल तेवढे निरागसपणे वागायला शिकले पाहिजे. हे करता आले नाही की, प्रौढत्व सुद्धा एका वेगळ्याच धुंदीत आणि आपल्याच विश्वात निघून जाते. मग अनेक प्रश्न आणि पश्चाताप घेऊन वार्धक्य येते...हेच वार्धक्य मरेपर्यंत आपल्याला विचारत राहते... वेड्या एवढे सुंदर आयुष्य मिळाले असताना निरागस, चांगले का वागला नाहीस... हे का नाही केलेस....? ते का नाही केलेस...? तुझ्या ऐन उमेदीच्या काळात दुसऱ्यांना का समजून घेतले नाहीस...? त्यांच्या इच्छा-आकांक्षा, स्वप्न का समजून घेतले नाहीस...? आयुष्यात किती माणसे जोडलीस...? कोणाकोणाच्या भावना आणि इच्छा, आकांक्षा समजून घेतल्यास...? कोणाच्या स्वप्नाला बळ दिले...? कोणा कोणाचा आधार झालास...? आणि ज्यावेळी स्वतः आपण आपल्या आयुष्याचा हिशोब मांडतो...त्यावेळी फसवणार तरी कसे आणि कुणाला...? मग उरतो तो पश्चाताप...बऱ्याच गोष्टी सहज करता आल्या असत्या... पण केल्या नाहीत... का केल्या नाहीत...? याचे उत्तर मिळतच नाही...मग आयुष्यातील असेच काही प्रश्न कायम अनुत्तरीत राहतात.

प्रत्येकाच्या आयुष्यातील प्रौढत्वाचा काळ महत्वाचा असतो. हाच काळ स्थिरस्थावरतेचा आणि उत्कर्षाचा असतो. साध्य करता येतील तेवढी सगळी स्वप्नं आपण साकारलेली असतात. आपल्या आपल्या परीने आपण कर्तृत्व सिद्ध केलेले असते. आपल्याला अपेक्षित असणारी आयुष्यातील उंची आपण आपल्या परीने साधलेली असते. याचा अर्थ इथे सर्व थांबते असा नाही. एका बाजूला आपले शिक्षण, कर्तृत्व, प्रतिभेची भरारी, उत्कर्षाचा शिरोबिंदू साधने चालूच असते. अजूनही आपली स्वप्ने असतात. ती साकार करण्याची धडपड असते. हे सर्व आपल्या देहाचा शेवटचा श्वास चालू असेपर्यंत चालणारच आहे. परंतु प्रौढत्वाचा काळ हा संपूर्ण अर्थाने गुंतवणुकीचा काळ असतो. याच काळात खऱ्या अर्थाने सर्व बाजूनी गुंतवणूक करायची असते. म्हणजेच जीवन जगण्यासाठी लागणारा धनसंचय आणि आर्थिक गुंतवणूक तर करायचीच असते. याच बरोबर चांगुलपणा, निरागसपणा जपायचा असतो. तारुण्याच्या धुंदीत कळत - नकळत घडून गेलेल्या चुका सुधारायच्या असतात. कोणत्याही कारणामुळे अथवा समज-गैरसमजामुळे गमावलेल्या माणसांना पुन्हा मिळवायची असते. लेकरं मोठी करायची असतात...त्यांचे संगोपण करायचे असते... गगनभरारीची ताकद त्यांच्या पंखात भरायची असते...आता त्यांना स्वप्नं बघायला शिकवायचे असते... त्यांचीच स्वप्ने समजून घ्यायची असतात...आता त्यांच्या स्वप्नांना आपले समजायचे असते...आणि आता त्यांची स्वप्नं साकार करण्यासाठी जगायचे असते.

स्वप्न कुणाचीही असोत...अगदी आपल्या मुलांची सुद्धा...ज्यावेळी दुसऱ्याच्या स्वप्नाला आपण आपले समजतो...त्यांचे स्वप्न साकार करण्याच्या तळमळीच्या प्रयत्नात जेव्हा आपण सहभागी होतो... त्यावेळी त्या व्यक्तीला वाटणारा आनंद आणि आधार शब्दात व्यक्त करता येत नाही. आयुष्यभर जी माणसे स्वतःसाठी जगतात. स्वतःचेच आयुष्य घडवतात. स्वतःला उत्तुंग यशाच्या शिखरापर्यंत नेतात. आपल्या प्रचंड कष्टाच्या आणि मेहनतीच्या बळावर उज्ज्वल आणि अफाट कर्तृत्व साध्य करतात अशी सगळी माणसे खूप कर्तृत्ववान असतात. त्यांचा ऐन उमेदीचा आणि कर्तृत्वाचा काळ आनंदात जातो. पण वार्धक्यात मात्र त्यांना प्रश्न पडतात...तुम्ही इतरांसाठी काय केलात...? वार्धक्यात माणसाचे स्वतःचे मन सुद्धा स्वतःला विचारत राहते... आयुष्यात दुसऱ्यासाठी किती जगलास...? त्यावेळी आपल्याकडे उत्तर नसते आणि आपल्याला समजून घेणारी आणि आधार देणारी माणसे सुद्धा नसतात...आयुष्याच्या उत्तरार्धात म्हणजेच आपल्या वृद्धापकाळात आपल्या उषा-पायथ्याला जीवाभावाची आणि आपल्यावर निस्सीम प्रेम करणारी माणसे असावीत...अशी जर आपली अपेक्षा असेल...तर आपण आपल्या उमेदीच्या काळात संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला समजून घेणे...त्यांच्या भाव-भावना, आशा, अपेक्षा, आकांक्षा आणि त्यांची स्वप्ने यांचा सार्थ आदर करणे...त्यांना जमेल तेवढी मदत करणे... आवश्यक असते.

आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात ज्यावेळी आपण आपल्या स्वतःचा जीवनपट मागे वळून पाहतो... आपल्या संपूर्ण आयुष्याचा हिशोब मांडतो...त्यावेळी कुठल्याच कारणाने आपल्याला पश्चाताप वाटायला नको... असे वाटत असेल तर आत्ता खऱ्या अर्थाने जागे होण्याची वेळ आहे... जे जे कळत-नकळत चुकले आहे ते बरोबर करण्याची वेळ आहे...प्रत्येकाच्या जीवनाला अनेक पैलू असतात...त्या सर्व पैलूंचा विचार झालेला नसतो... कळत-नकळत काही गोष्टी दुर्लक्षित केलेली असतात...त्या सर्व दुर्लक्षित केलेल्या बाबींना पुन्हा महत्व द्यायचे असते...जीवनात अनावधानाने आपल्याकडून ज्यांच्यावर अन्याय झाला आहे... त्याला न्याय देण्याचा प्रयत्न करायचा असतो.

आताच्या घडीला तुमचे प्रत्यक्ष वागणे फार महत्त्वाचे असते...तुम्ही करत असलेली कर्तव्ये महत्त्वाची असतात....पार पाडत असणाऱ्या जबाबदाऱ्यांना योग्य न्याय देणे महत्त्वाचे असते...आता आपण फक्त मोकळेपणाने आणि संपूर्णपणे माणुसकी जपत जमेल तेवढ्या निरागसतेने जगायचे असते. आता लोकांची आपल्याबद्दल काय मते आहेत. याचा फारसा विचार करण्याची गरज नसते... याउलट आपण लोकांबद्दल माया, ममता, आपुलकी, प्रेम जिव्हाळा ठेवायचा असतो. आता कोणी मदत करावी अशी अपेक्षा उरलेली नसते...याउलट आपल्याला इतरांना मदत करता येईल का...? याची धडपड करायची असते.

आता पूर्णपणे आपण आपल्या विश्वात हरवून जाऊ शकत नाही. मुळात आपल्या स्वतःचे एकटे विश्व राहिलेले नसते. आतापर्यंत आपल्या विश्वात अनेक माणसे सहभागी झालेली असतात. त्यांच्यासाठीचे जगणे सुरू झालेले असते. अशा प्रकारचे जगणे हा आता आपल्या सवयीचा भाग झालेला असतो. सतत चांगले वागून चांगुलपणाची सहजप्रवृत्ती वृत्तीत तयार झालेली असते. अनेक टचके-टोमणे खाल्ल्यानंतर....खूप मोठ्या संघर्षानंतर...खूप चांगले वाईट दिवस पाहिल्यानंतर...आणि सुख, दुःखाचे अनेक प्रसंग अनुभवल्यानंतर आलेले हे शहाणपण असते...आणि या शहाणपणालाच आता निरागसपणाची, अल्लडपणाची जोड द्यायची असते...बघा जमेल का तुम्हाला...? जमल्यास खूप चांगले होईल...जगाबरोबर तुम्हीसुद्धा सुंदर बनून जाल.

हे जीवन ही एक मैफिल आहे.

दोस्तहो, यारहो, मित्रहो आयुष्यात नवनवीन बरेच काही शिकता आहात, पण खऱ्या अर्थाने निरागस जगायला कधी शिकणार आहात?

**-मधुकरराव जोशी**
ग्रीन पार्क जिंतूर, जि. परभणी
मो. ९७६७७३३५६०
७९७२३४४१२८

# प्लास्टिक प्रदूषणाचा विळखा; जबाबदारी स्वीकारण्याची वेळ!

आजच्या आधुनिक जीवनशैलीत प्लास्टिकचा वापर अपरिहार्य बनला आहे. घरगुती वस्तूंपासून ते औद्योगिक उत्पादनांपर्यंत, अन्नपदार्थांच्या पॅकिंगपासून ते दैनंदिन खरेदीपर्यंत सर्वत्र प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. प्लास्टिकने मानवी जीवन सुलभ केले असले, तरी त्याच्या अनियंत्रित वापरामुळे पर्यावरणापुढे गंभीर संकट उभे राहिले आहे. रस्त्याच्या कडेला साचलेला प्लास्टिक कचरा, नाल्यांमध्ये अडकलेल्या प्लास्टिकच्या पिशव्या, नद्या आणि समुद्रात वाढणारे प्रदूषण हे भविष्यातील धोक्याचे संकेत आहेत. त्यामुळे प्लास्टिक प्रदूषणाचा विळखा दूर करण्यासाठी आता केवळ चर्चा आणि जनजागृती पुरेशी नाही, तर प्रत्येकाने आपली जबाबदारी स्वीकारून कृती करण्याची वेळ आली आहे.

१) प्लास्टिकचा वाढता वापर ही गंभीर समस्या:प्लास्टिकचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याची टिकाऊ क्षमता; मात्र पर्यावरणाच्या दृष्टीने हेच वैशिष्ट्य मोठी समस्या ठरत आहे. अनेक प्रकारचे प्लास्टिक नैसर्गिक वातावरणात विघटित होण्यासाठी दीर्घकाळ घेतात. परिणामी, प्लास्टिक कचरा जमिनीत साचतो, जलस्रोत दूषित करतो आणि पर्यावरणाचे संतुलन बिघडवतो. प्लास्टिकच्या पिशव्या आणि इतर कचऱ्यामुळे नाल्यांमध्ये अडथळे निर्माण होतात. पावसाळ्यात पाणी तुंबण्याच्या समस्येतही त्याचा वाटा असू शकतशहरांपासून ग्रामीण भागापर्यंत प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. विशेषतः बाजारपेठा, पर्यटनस्थळे, सार्वजनिक ठिकाणे आणि जलस्रोतांच्या परिसरात प्लास्टिकचा कचरा मोठ्या प्रमाणात आढळतो.

२) शासनाचे नियम आणि अंमलबजावणी आवश्यक:प्लास्टिक प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी शासनाने विविध नियम आणि उपाययोजना केल्या आहेत. काही विशिष्ट एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तूंवर देशात बंदी लागू आहे. मात्र, नियम अस्तित्वात असणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे यात फरक आहे. अनेक ठिकाणी बंदी असलेल्या प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर आणि विक्री सुरू असल्याचे दिसून येतप्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी नियमित तपासणी करणे, कचरा संकलन व्यवस्था सक्षम करणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करणे आवश्यक आहे.

नागरिकांना योग्य पर्याय उपलब्ध करून देणे, कचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक सुविधा निर्माण करणे आणि पर्यावरणपूरक उत्पादनांना प्रोत्साहन देणे यावरही भर द्यावा लागेल.

३) प्लास्टिकला पर्याय स्वीकारण्याची गरज:प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी त्याचा अनावश्यक वापर टाळणे हा सर्वांत महत्त्वाचा उपाय आहे. बाजारात खरेदीसाठी जाताना कापडी पिशवी सोबत नेणे, एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तू टाळणे, पाणी पिण्यासाठी पुनर्वापर करता येणाऱ्या बाटल्यांचा वापर करणे आणि टिकाऊ वस्तूंना प्राधान्य देणे अशा छोट्या सवयींमधून मोठा बदल घडू शकतमात्र, प्लास्टिकला पर्याय निवडतानाही विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे.

४) कचरा व्यवस्थापनात नागरिकांची भूमिका महत्त्वाची:प्लास्टिक प्रदूषण रोखण्याची जबाबदारी केवळ शासनाची किंवा स्वच्छता कर्मचाऱ्यांची नाही. प्रत्येक नागरिकाने आपल्या दैनंदिन वर्तनात बदल करणे आवश्यक आहे. घरातील ओला आणि सुका कचरा वेगळा करणे, प्लास्टिक कचरा रस्त्यावर किंवा जलस्रोतांमध्ये न टाकणे, पुनर्वापरयोग्य प्लास्टिक स्वतंत्रपणे जमा करणे आणि स्थानिक कचरा संकलन व्यवस्थेचा योग्य वापर करणे या बाबी प्रत्येकाने पाळल्या पाहिजेत.

ग्रामपंचायती, नगरपालिका, स्वयंसेवी संस्था, व्यापारी संघटना आणि महिला बचतगट यांच्या सहभागातून प्लास्टिकमुक्त परिसर निर्माण करण्यासाठी व्यापक अभियान राबविता येईल. सण, उत्सव, विवाह समारंभ आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी आयोजकांनी पुढाकार घ्यावा.

५) पुनर्वापर आणि पुनर्चक्रणाला प्रोत्साहन हवे:प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करणे अनेक क्षेत्रांत सध्या सहज शक्य नसले, तरी त्याचा वापर कमी करणे, पुनर्वापर वाढविणे आणि योग्य पुनर्चक्रण करणे शक्य आहे.

पुनर्चक्रणाच्या पायाभूत सुविधा वाढविणे, कचरा वेचकांना सुरक्षित कामाच्या सुविधा उपलब्ध करून देणे आणि पुनर्चक्रित साहित्यापासून तयार होणाऱ्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणे याकडेही लक्ष दिले पाहिजे.

६) आजची कृतीच उद्याचे पर्यावरण सुरक्षित करेल! :प्लास्टिक प्रदूषण ही केवळ पर्यावरणाची समस्या नसून ती सामाजिक जबाबदारी आणि भविष्यातील पिढ्यांच्या सुरक्षिततेशी निगडित बाब आहे. आपण वापरलेली प्लास्टिकची वस्तू कचरापेटीत टाकल्यानंतर आपली जबाबदारी संपत नाही. त्या कचऱ्याचे पुढे काय होते, त्याचे योग्य व्यवस्थापन होते का आणि त्याचा पर्यावरणावर काय परिणाम होतो, याचाही विचार केला पाहिजे. आज आपण प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळला, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन केले आणि पर्यावरणपूरक सवयी स्वीकारल्या, तर उद्याच्या पिढ्यांसाठी स्वच्छ आणि सुरक्षित पर्यावरण निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकता येईल. निसर्गाचे रक्षण ही केवळ घोषणा न राहता ती प्रत्येकाच्या जीवनशैलीचा भाग बनली पाहिजे. कारण प्लास्टिक प्रदूषणाचा विळखा तोडण्यासाठी दुसऱ्याने पुढाकार घेण्याची वाट पाहण्यापेक्षा 'मी काय करू शकतो?' हा प्रश्न स्वतःला विचारून कृती करण्याची हीच वेळ आहे.

**-प्रा. संजय बडे**
दहेगाव, ता. वैजापूर,
जि. छत्रपती संभाजी नगर
मो.७८८८२९७८५९

# प्रगतीमंत्र

## अहमदाबादच्या लक्ष्य शर्मा आणि दीप संघानी यांची यशोगाथा

# कापडाच्या कचऱ्यापासून मजबूत बांधकाम साहित्याची निर्मिती

### 75 गुंतवणूकदारांनी नाकारले, तरी कल्पनेवरील विश्वास कायम; आज वर्षाला साडेचार कोटींची उलाढाल!

**एखादी कल्पना चांगली असली, तरी सुरुवातीला तिच्यावर विश्वास ठेवणारे फार कमी लोक असतात. मात्र, स्वतःच्या कल्पनेवर ठाम विश्वास ठेवून सातत्याने प्रयत्न केले, तर अशक्य वाटणारे स्वप्नही प्रत्यक्षात उतरू शकते. अहमदाबाद येथील लक्ष्य शर्मा आणि दीप संघानी या दोन तरुणांनी हे सिद्ध करून दाखवले आहे. कापड उद्योगातून निर्माण होणाऱ्या कचऱ्यापासून मजबूत बांधकाम साहित्य तयार करण्याची कल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणली. सुरुवातीला तब्बल ७५ गुंतवणूकदारांनी त्यांची कल्पना नाकारली; मात्र, त्यांनी हार मानली नाही. आज त्यांच्या 'री-व्हर्स' (Re-Verse) या स्टार्टअपने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ४.५ कोटी रुपयांची उलाढाल नोंदवली आहे.**



## स्टार्टअप संमेलनात झाली भेट

मार्च २०२४ मध्ये अहमदाबाद येथे झालेल्या एका स्टार्टअप संमेलनात लक्ष्य शर्मा आणि दीप संघानी यांची भेट झाली. लक्ष्य यांनी वेबस्टर विद्यापीठात शिक्षण घेतले आहे, तर दीप हे त्यावेळी जयपूर येथील मालवीय राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेत (एमएनआयटी) यांत्रिकी अभियांत्रिकीचे शिक्षण घेत होते. दोघांनीही भारतात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर निर्माण होणाऱ्या कापडाच्या कचऱ्याच्या समस्येवर उपाय शोधण्याचे ठरवले. या कचऱ्यामुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम कमी करण्याच्या उद्देशाने त्यांनी जून २०२४ मध्ये 'री-व्हर्स' या स्टार्टअपची स्थापना केली. मात्र, सुरुवातीचा प्रवास सोपा नव्हता. कापडाच्या कचऱ्यापासून लाकूड किंवा प्लायवूडइतके मजबूत साहित्य तयार होऊ शकत नाही, असे मत व्यक्त करत तब्बल ७५ गुंतवणूकदारांनी त्यांच्या कल्पनेला नकार दिला. तरीही दोघांनी आपल्या कल्पनेवरील विश्वास ढळू दिला नाही.

## कापडाच्या कचऱ्यापासून मजबूत बांधकाम साहित्य

आपल्या कल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप देण्यासाठी या तरुणांनी अहमदाबादमधील पीराणा औद्योगिक परिसरात ६० हजार चौरस फुटांची उत्पादन सुविधा उभारली. तैवानमधील WYNIST या कंपनीच्या सहकार्याने त्यांनी 'वेनिक्स' (Weinix) या प्रमुख ब्रँडअंतर्गत उत्पादन सुरू केले. या उत्पादन प्रक्रियेत ७० टक्के कापडाचा कचरा आणि ३० टक्के पर्यावरणपूरक जैव-बंधनकारक घटकांचा वापर करून आठ बाय चार फूट आकाराचे संमिश्र फलक तयार केले जातात. या फलकांची वैशिष्ट्ये म्हणजे ते जलरोधक, वाळवीप्रतिबंधक, अग्निरोधक आणि डागांना प्रतिकार करणारे आहेत. तसेच, ते मजबूत असल्याने फर्निचर आणि बांधकाम क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या प्लायवूड, एमडीएफ आणि संगमरवराला पर्याय ठरू शकतात.

## 100 कोटी रुपयांपर्यंत कंपनीचे मूल्यांकन

सुरुवातीच्या अडचणींवर मात करत दोन्ही संस्थापकांनी कुटुंबीय आणि मित्रांच्या मदतीने निधी उभारला. त्यानंतर कंपनीने संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून ९.५ कोटी रुपयांचा प्रारंभिक निधी मिळवला. या टप्प्यावर कंपनीचे मूल्यांकन १०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचले. नोव्हेंबर २०२५ मध्ये कंपनीने व्यावसायिक विक्री सुरू केली. या व्यवसायाचे वैशिष्ट्य केवळ आर्थिक यशापुरते मर्यादित नाही. कापडाचा कचरा भरावभूमीत जाण्याऐवजी त्याचा पुनर्वापर केला जातो. कंपनीच्या दाव्यानुसार, त्यांच्या उत्पादनांमुळे दरवर्षी १० लाखांहून अधिक झाडांची तोड टाळण्यास मदत होऊ शकते.

## परदेशी बाजारपेठेतही विस्तार

'री-व्हर्स'ने आता जर्मनीसारख्या युरोपीय बाजारपेठांमध्येही निर्यात सुरू केली आहे. आगामी काळात उत्तर अमेरिका आणि मध्यपूर्वेतील बाजारपेठांमध्ये व्यवसायाचा विस्तार करण्याची कंपनीची योजना आहे. पुढील १२ ते २४ महिन्यांत कंपनीला आपली मासिक उत्पादन क्षमता सध्याच्या १.२ लाख चौरस फुटांवरून १० लाख चौरस फुटांपर्यंत वाढवायची आहे. त्याचबरोबर वार्षिक उलाढाल १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## पाच वर्षांत 8,000 कोटींच्या मूल्यांकनाचे लक्ष्य

कंपनीने भविष्यासाठी आणखी मोठी उद्दिष्टे निश्चित केली आहेत. पुढील पाच वर्षांत कंपनीचे मूल्यांकन आठ हजार कोटी रुपयांपर्यंत नेऊन प्रारंभिक समभाग विक्रीद्वारे (आयपीओ) शेअर बाजारात प्रवेश करण्याचे संस्थापकांचे उद्दिष्ट आहे. ७५ गुंतवणूकदारांनी नाकारलेल्या कल्पनेपासून कोट्यवधींची उलाढाल करणाऱ्या उद्योगापर्यंतचा हा प्रवास तरुण उद्योजकांसाठी प्रेरणादायी आहे. पर्यावरणीय समस्येकडे केवळ संकट म्हणून न पाहता, त्यातून व्यवसायाची संधी शोधली तर कचऱ्याचेही मूल्य निर्माण करता येते, हे लक्ष्य शर्मा आणि दीप संघानी यांनी दाखवून दिले आहे.





# 'जेईई मेन'च्या पहिल्या सत्रासाठी नोंदणी सुरू

## परीक्षेच्या तारखांमध्येही बदल, जाणून घ्या महत्त्वाचे तपशील...




**संयुक्त प्रवेश परीक्षा मुख्य (जेईई मेन) २०२७ च्या पहिल्या सत्रासाठी राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (एनटीए) अधिसूचना प्रसिद्ध करून ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू केली आहे. अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना jeemain.nta.nic.in या अधिकृत संकेतस्थळावरून अर्ज करता येणार आहे. यंदा अर्ज प्रक्रियेत विलंब शुल्कासह नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, परीक्षेच्या तारखांमध्येही बदल करण्यात आला आहे.**

### परीक्षेच्या तारखांमध्ये बदल

एनटीएच्या यापूर्वीच्या वेळापत्रकानुसार, जेईई मेन २०२७ च्या पहिल्या सत्रातील परीक्षा २२, २३, २४, २८, २९ आणि ३० जानेवारी रोजी होणार होती. तसेच, ३१ जानेवारी हा राखीव दिवस म्हणून नमूद करण्यात आला होता. मात्र, नव्या अधिसूचनेनुसार परीक्षेच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे. आता ही परीक्षा २०, २१, २२, २३, २४ आणि २८ जानेवारी २०२७ या दिवशी घेतली जाणार आहे. नव्या अधिसूचनेत राखीव दिवसाबाबत स्वतंत्र माहिती देण्यात आलेली नाही.



## विलंब शुल्कासह अर्ज करण्याची सुविधा

एनटीएने जेईई मेन २०२७ च्या पहिल्या सत्रासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २२ नोव्हेंबर २०२६ निश्चित केली आहे. या मुदतीत अर्ज सादर न करू शकणाऱ्या विद्यार्थ्यांना ५०० रुपये विलंब शुल्क भरून नोंदणी करण्याची संधी देण्यात आली आहे. विलंब शुल्कासह अर्ज करण्यासाठी २३ ते २६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत नोंदणीची सुविधा उपलब्ध असेल. त्यामुळे नियमित मुदतीत अर्ज करता न आलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी अर्ज करण्याची आणखी एक संधी मिळणार आहे.

## परीक्षेचे स्वरूप आणि कालावधी

**जेईई मेन परीक्षेचा कालावधी विद्यार्थ्यांनी निवडलेल्या प्रश्नपत्रिकेनुसार वेगवेगळा असेल.**

- पेपर १ (बी.ई./बी.टेक.) : ३ तास
- पेपर २-अ (बी.आर्क.) : ३ तास
- पेपर २-ब (बी.प्लॅनिंग) : ३ तास
- बी.आर्क. आणि बी.प्लॅनिंग या दोन्ही प्रश्नपत्रिका : ३ तास ३० मिनिटे

परीक्षा दोन सत्रांत घेतली जाणार आहे. पहिल्या सत्राची सुरुवात सकाळी ९ वाजता, तर दुसऱ्या सत्राची सुरुवात दुपारी ३ वाजता होईल. तीन तासांच्या परीक्षेसाठी पहिले सत्र दुपारी १२ वाजता आणि दुसरे सत्र सायंकाळी ६ वाजता संपेल. साडेतीन तासांच्या परीक्षेसाठी पहिले सत्र दुपारी १२.३० वाजता आणि दुसरे सत्र सायंकाळी ६.३० वाजता संपणार आहे.

| तपशील | तारीख |
|---|---|
| ऑनलाइन नोंदणी सुरू | २४ ऑक्टोबर २०२६ |
| अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत | २२ नोव्हेंबर २०२६, रात्री ११.५० वाजेपर्यंत |
| विलंब शुल्काशिवाय परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम मुदत | २२ नोव्हेंबर २०२६, रात्री ११.५० वाजेपर्यंत |
| विलंब शुल्कासह अर्ज करण्याचा कालावधी | २३ ते २६ नोव्हेंबर २०२६ |
| विलंब शुल्कासह शुल्क भरण्याची अंतिम मुदत | २६ नोव्हेंबर २०२६, रात्री ११.५० वाजेपर्यंत |
| अर्जातील चुका दुरुस्त करण्याची मुदत | २७ ते २९ नोव्हेंबर २०२६, रात्री ११.५० वाजेपर्यंत |
| परीक्षा केंद्राचे शहर जाहीर होण्याची तारीख | ३० डिसेंबर २०२६ |
| प्रवेशपत्र जारी होण्याची तारीख | १३ जानेवारी २०२७ |
| पहिल्या सत्रातील परीक्षेच्या तारखा | २०, २१, २२, २३, २४ आणि २८ जानेवारी २०२७ |

## जेईई मेन 2027 साठी अर्ज कसा कराल?

सर्वप्रथम जेईई मेनच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या. तेथे 'JEE Main 2027 Session 1' या नोंदणी दुव्यावर क्लिक करा. विचारलेली वैयक्तिक आणि संपर्कविषयक माहिती भरून नवीन नोंदणी पूर्ण करा. नोंदणीदरम्यान मिळालेला अर्ज क्रमांक आणि संकेतशब्द वापरून संकेतस्थळावर प्रवेश करा. अर्जामध्ये वैयक्तिक माहिती, शैक्षणिक तपशील आणि आवश्यक इतर माहिती भरा. निर्धारित स्वरूपात छायाचित्र, स्वाक्षरी आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करा. उपलब्ध ऑनलाइन माध्यमांद्वारे परीक्षा शुल्क भरा. भरलेल्या अर्जातील सर्व माहिती काळजीपूर्वक तपासून अर्ज सादर करा. अर्ज सादर केल्यानंतर पुष्टीकरण पृष्ठ (कन्फर्मेशन पेज) डाउनलोड करून जतन करा.



## जेईई मेन परीक्षेचे महत्त्व

जेईई मेन ही राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षा आहे. या परीक्षेच्या गुणांच्या आधारे राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (एनआयटी), भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्था (आयआयआयटी) तसेच इतर सहभागी संस्थांमधील अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळवता येतो. याशिवाय, जेईई मेनमधील पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या आणि सर्वोच्च गुण मिळविणाऱ्या अडीच लाख पात्र उमेदवारांना जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेसाठी संधी मिळते. या परीक्षेच्या आधारे भारतीय तंत्रज्ञान संस्थांमध्ये (आयआयटी) प्रवेश मिळविण्याचा मार्ग खुला होतो. तथापि, प्रवेशासाठी संबंधित पात्रता निकष पूर्ण करणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांनी अर्जाची अंतिम मुदत, परीक्षा शुल्क, परीक्षेचे वेळापत्रक आणि प्रवेशपत्रासंबंधीच्या अद्ययावत माहितीसाठी एनटीएच्या अधिकृत संकेतस्थळाला नियमित भेट द्यावी.

# गुंतवणूक, संपत्ती व्यवस्थापनासाठी एक वर्षाचा एमबीए

**व्यवस्थापन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या आणि वित्तीय सेवा क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळवू पाहणाऱ्या उमेदवारांसाठी महत्त्वाची बातमी आहे. उदयपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) यांनी गुंतवणूक आणि संपत्ती व्यवस्थापन या विषयांमध्ये एक वर्षाचा पूर्णवेळ एमबीए अभ्यासक्रम सुरू केला आहे. या क्षेत्रात एक वर्षाचा पूर्णवेळ निवासी एमबीए अभ्यासक्रम सुरू करणारी ही पहिली आयआयएम संस्था आहे.**

भारताच्या वित्तीय सेवा क्षेत्राचा वेगाने विस्तार होत असताना गुंतवणूक व्यवस्थापन, संपत्ती नियोजन आणि आर्थिक सल्लागार सेवांमध्ये कुशल व्यावसायिकांची मागणी वाढत आहे. ही गरज लक्षात घेऊन हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. शैक्षणिक पात्रतेसोबतच कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विशेष कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळणार आहे.

## प्रवेशासाठी पात्रता काय?

- आयआयएम उदयपूरच्या प्रवेशविषयक माहितीनुसार, या अभ्यासक्रमासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडे मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विषयातील पदवी असणे आवश्यक आहे.
- सर्वसाधारण प्रवर्ग : पदवीमध्ये किमान ५० टक्के गुण किंवा समकक्ष सीजीपीए आवश्यक.
- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दिव्यांग उमेदवार : किमान ४५ टक्के गुण किंवा समकक्ष सीजीपीए आवश्यक.
- कामाचा अनुभव : पदवी पूर्ण केल्यानंतर किमान ३६ महिन्यांचा पूर्णवेळ, वेतनासह कामाचा अनुभव आवश्यक.
- २०२७-२८ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठी उमेदवारांचा आवश्यक कामाचा अनुभव २८ फेब्रुवारी २०२७ पर्यंत पूर्ण झालेला असणे गरजेचे आहे. त्यामुळे केवळ पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांना या अभ्यासक्रमासाठी थेट पात्रता मिळणार नाही. आवश्यक कामाचा अनुभव असणेही बंधनकारक आहे.

| अर्जाचा टप्पा | अर्जाची अंतिम मुदत | निकालाची तारीख |
|---|---|---|
| पहिला टप्पा | २३ नोव्हेंबर २०२६ | २२ डिसेंबर २०२६ |
| दुसरा टप्पा | ११ जानेवारी २०२७ | ३१ जानेवारी २०२७ |
| तिसरा टप्पा | ३१ जानेवारी २०२७ | १७ फेब्रुवारी २०२७ |

- एक वर्षाचा एमबीए अभ्यासक्रम नेमका काय आहे? : आयआयएम उदयपूरचा हा अभ्यासक्रम गुंतवणूक आणि संपत्ती व्यवस्थापनावर केंद्रित आहे. गुंतवणूक व्यवस्थापन या क्षेत्रात आर्थिक साधनांमध्ये गुंतवणूक करणे, गुंतवणुकीचे नियोजन करणे आणि त्यातून मिळणाऱ्या परताव्याचे व्यवस्थापन करणे यांचा समावेश होतो. संपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रात व्यक्तीच्या आर्थिक गरजा, उद्दिष्टे आणि जोखीम स्वीकारण्याची क्षमता लक्षात घेऊन संपत्तीचे नियोजन, व्यवस्थापन आणि वृद्धी करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. या अभ्यासक्रमाचा उद्देश वित्तीय सेवा क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या अनुभवी व्यावसायिकांना आवश्यक ज्ञान आणि कौशल्ये प्रदान करणे हा आहे.
- प्रवेशासाठी कोणती परीक्षा द्यावी लागेल? : या अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना उमेदवारांना पुढीलपैकी कोणत्याही एका परीक्षेचे गुण सादर करता येतील. कॅट (CAT), जीमॅट (GMAT), जीआरई (GRE). कॅट परीक्षेचे २०२२ किंवा त्यानंतरचे गुण स्वीकारले जाणार आहेत. जीमॅट आणि जीआरई परीक्षांचे गुण अर्जाच्या तारखेपूर्वीच्या पाच वर्षांच्या कालावधीत मिळवलेले असणे आवश्यक आहे. या दोन्ही परीक्षांसाठी संस्थेने परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष दिलेल्या परीक्षेची अटही नमूद केली आहे.
- प्रवेशासाठी अर्ज कधी करता येईल? : २०२७-२८ या शैक्षणिक वर्षासाठी संस्थेने अर्जाच्या तीन मुदती जाहीर केल्या आहेत. प्राथमिक निवड झालेल्या उमेदवारांना वैयक्तिक मुलाखतीसाठी बोलावले जाईल. अंतिम निवड करताना उमेदवाराची शैक्षणिक आणि व्यावसायिक पार्श्वभूमी तसेच संपूर्ण निवड प्रक्रियेतील कामगिरी विचारात घेतली जाईल. अभ्यासक्रम आणि प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे : iwm.iimu.ac.in



- एक वर्षाच्या एमबीएचे शुल्क किती? : २०२७-२८ च्या प्रवेशासाठी या अभ्यासक्रमाचे एकूण शुल्क २१.४७ लाख रुपये असल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे. या शुल्कामध्ये शिक्षण शुल्क, वसतिगृह शुल्क, पायाभूत सुविधा शुल्क, ३० हजार रुपयांची परत मिळणारी सुरक्षा अनामत आदी रकमेचा समावेश आहे. मात्र, भोजनालयाचा खर्च या शुल्कामध्ये समाविष्ट नाही. त्यासाठी विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे पैसे भरावे लागतील. याशिवाय, शुल्काचा तिसरा हप्ता भरताना पाच हजार रुपये माजी विद्यार्थी संघटनेचे शुल्कही द्यावे लागेल.

# मंधाना ब्रिगेडचा झिम्बाब्वेला दणका; टी२० पाठोपाठ वनडे मालिकाही नावावर



**वडोदरा (वृत्तसंस्था)** – भारतीय महिला क्रिकेट संघाने दुसऱ्या वनडे सामन्यात झिम्बाब्वेला पराभवाची धूळ चारली. या सामन्यात नाणेफेकीचा कौल भारताच्या बाजूने लागला आणि कर्णधार स्मृती मंधानाने प्रथम फलंदाजी निवडली. भारताने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकात ६ गडी गमवून ३२८ धावा केल्या आणि विजयासाठी ३२९ धावांचं आव्हान दिलं. हे आव्हान काही झिम्बाब्वे संघाला गाठता आलं नाही.

झिम्बाब्वेचा संघ २०७ धावांपर्यंत मजल मारू शकला. भारताने हा सामना १२१ धावांनी जिंकला. भारताने तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील सलग दुसरा सामना जिंकून मालिकाही खिशात घातली आहे. त्यामुळे आता तिसरा वनडे सामना हा औपचारिक असणार आहे. टी२० नंतर वनडे मालिकेतही क्लिन स्विप देण्याची संधी भारतीय क्रिकेट संघाकडे आहे. स्मृती मंधानाने नेतृत्व हाती घेतल्यानंतर टी२०नंतर पहिला वनडे मालिका विजय आहे. भारताने विजयासाठी दिलेल्या ३२९ धावांचा पाठलाग करताना लॉरीन फिरी ६ धावा करून बाद झाली. त्यानंतर झिम्बाब्वेच्या मॉडेस्टर मपाचिकवा आणि चिपो मुगेरी तिरिपानो यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ६९ धावांची भागीदारी केली. पण या दोघांची विकेट पडली आणि डाव गडगडला. त्यानंतर टप्प्याटप्प्याने विकेट पडत गेल्या आणि धावगती वाढत गेली. प्रत्येक चेंडूवर सामना झिम्बाब्वेच्या हातून निसटत गेला. मॉडेस्टर मुपाचिकवा ४९, चिपो मुगेरी-तिरिपानो ४६, प्रिय बिझा ३४, जोसेफिन न्कोमो २०, मिशेल मावुंगा ३, न्याशा ग्वांझुरा २०, नोमवेलो सिबांडा ०, टेंडाई माकुशा ०, धावा करून बाद झाले. भारताकडून वैष्णवी शर्मान १० षटकात ३९ धावा देत ४ विकेट काढल्या.

दुसऱ्या वनडे सामन्यात भारताची सुरूवात काही खास झाली नाही. कर्णधार स्मृती मंधाना पहिल्याच षटकात एकही धाव न करता बाद झाली. त्यानंतर आलेली शफाली वर्माही स्वस्तात बाद झाली. तिला फक्त ८ धावा करता आल्या. पण त्यानंतर प्रतिका रावल आणि हरमनप्रीत कौरची जोडी जमली. या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी १२४ धावांची भागीदारी केली. प्रतिका रावल ६१ धावांवर असताना बाद झाली. त्यानंतर आलेली तेजल हसबनीसही फक्त ३ धावा करून तंबूत परतली. असं असताना हरमनप्रीत कौर आणि दीप्ति शर्मा जोडीने झिम्बाब्वेच्या गोलंदाजांना फोडून काढलं. या जोडीने पाचव्या विकेटसाठी १३७ चेंडूत १५३ धावांची भागीदारी केली. हरमनप्रीत कौरने १२१ चेंडूत १५ चौकारांच्या मदतीने १२६ धावा केल्या. तर दीप्ति शर्माने ८६ चेंडूत १५ चौकार मारत नाबाद १०६ धावांची खेळी केली. ऋचा घोष ७ धावा करून बाद झाली.

# अल्पसंख्याकांच्या हक्कांवरून भारताने संयुक्त राष्ट्रांमध्ये पाकिस्तानला फटकारले




**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– संयुक्त राष्ट्र महासभेच्या तिसऱ्या समितीमधील एका संवादात्मक चर्चेदरम्यान भारताने पुन्हा एकदा पाकिस्तानचा पर्दाफाश केला आहे. पाकिस्तान स्वतःच्याच नागरिकांचे रक्षण करण्यात अपयशी ठरत असताना आंतरराष्ट्रीय मंचाचा गैरवापर करत असल्याचा जोरदार प्रहार भारताने केला आहे. तसेच जम्मू आणि काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असून पाकिस्तानने आपल्या बेकायदेशीर ताब्यातील सर्व भाग रिकामा करावा, अशी स्पष्ट मागणी भारताने केली आहे.

संयुक्त राष्ट्र महासभेच्या तिसऱ्या समितीमध्ये अल्पसंख्याक मुद्द्यांवरील विशेष प्रतिनिधींसोबत झालेल्या संवादात्मक चर्चेत भारताच्या स्थायी मिशनचे प्रथम सचिव, रघु पुरी यांनी पाकिस्तानच्या भूमिकेचा तीव्र शब्दांत निषेध केला. ते म्हणाले की, अपेक्षेप्रमाणे पाकिस्तानने आपल्या संकुचित राजनैतिक लाभासाठी आणि प्रसिद्धीसाठी जागतिक मंचाचा गैरवापर केला आहे. पाकिस्तानी प्रतिनिधींनी लष्करी मुख्यालयाच्या निर्देशांचे पालन करण्याऐवजी स्वतःच्या देशातील नागरिकांच्या कल्याणावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

रघु पुरी यांनी अधोरेखित केले की, सार्वभौम समानतेच्या तत्त्वावर आधारित अल्पसंख्याकांच्या हक्कांचे रक्षण करणे ही प्रामुख्याने प्रत्येक राष्ट्राची सार्वभौम जबाबदारी आहे. भारताच्या विविधतेची समृद्ध सांस्कृतिक परंपरा देशातील धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांसाठी असलेल्या भक्कम घटनात्मक संरक्षणातून स्पष्टपणे दिसून येते. तसेच, देशाच्या सर्वोच्च पदांपासून ते प्रमुख संस्थांपर्यंत आणि राष्ट्रीय विकासात अल्पसंख्याक समुदायांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.

धार्मिक अल्पसंख्याकांचे संरक्षण करण्यात आणि असुरक्षित समुदायांना सांभाळण्यात पाकिस्तान सातत्याने अपयशी ठरत आला आहे. असे असतानाही पाकिस्तानकडून धार्मिक स्वातंत्र्य आणि अल्पसंख्याकांच्या मुद्द्यांवर भारतावर खोटे आरोप करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या पार्श्वभूमीवर, पाकिस्तानने आत्मपरीक्षण करून स्वतःच्या देशातील नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवण्यावर लक्ष केंद्रित करावे, असा सज्जड दम भारताने युनोच्या मंचावरून भरला आहे.

# इंडो-पॅसिफिकमधील घडामोडींवर भारताचे बारकाईने लक्ष; राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी हवाई दल सज्ज



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील अलीकडील घडामोडींमुळे अधिक सतर्क राहण्याची आणि प्रादेशिक सहकार्य वाढवण्याची गरज आहे. भारताचे राष्ट्रीय हित, सार्वभौमत्व आणि कृती स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी भारतीय हवाई दल सज्ज आहे, असे हवाई दल प्रमुख ए. पी. सिंग यांनी रविवारी स्पष्ट केले. इंडो-पॅसिफिक क्षेत्रात चीनच्या वाढत्या लष्करी हालचालींबाबत जागतिक स्तरावर चिंता व्यक्त होत असताना त्यांनी हे विधान केले.

पीटीआय या वृत्तसंस्थेशी बोलताना ए. पी. सिंग म्हणाले की, इंडो-पॅसिफिक क्षेत्र जागतिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे बनले आहे. या भागात लष्करी हालचाली वाढत असून सामरिक स्पर्धा आणि संघर्षाचे वातावरणही दिसून येत आहे. भारतीय हवाई दल या प्रदेशातील घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. अलीकडील परिस्थिती लक्षात घेता सतर्कता, प्रभावी प्रतिबंधक क्षमता आणि प्रादेशिक देशांमधील सहकार्य वाढवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. उद्भवणारी आव्हाने वेळीच ओळखून त्यांना सामोरे जाण्यास सक्षम असलेले हवाई दल उभारण्यावर भारताचा भर आहे. विविध क्षेत्रांमध्ये समन्वयाने कार्य करून आवश्यक परिणाम साधण्याची क्षमता विकसित केली जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

ऑपरेशन सिंदूरचा संदर्भ देताना ए. पी. सिंग यांनी सांगितले की, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर केलेली कारवाई ही भारतीय हवाई दलाच्या क्षमता-केंद्रित दृष्टिकोनाची पुष्टी होती. यापुढे केवळ स्वतंत्र विमानांच्या क्षमतेवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी संपूर्ण यंत्रणा एकत्रितपणे कार्य करण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक विमान, सेन्सर, शस्त्र आणि नेटवर्क यांचा समन्वय साधल्यास त्यांची एकत्रित क्षमता अधिक प्रभावी ठरते, असेही ते म्हणाले. इंडो-पॅसिफिकमधील बदलत्या सुरक्षा परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत आपल्या संरक्षण क्षमतांमध्ये सुधारणा करत असून, राष्ट्रीय हितांचे रक्षण करणे हे भारतीय हवाई दलाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे ए. पी. सिंग यांनी स्पष्ट केले.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांचा ड्रग्ज माफियांना इशारा!



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– आंतरराष्ट्रीय सीमांचा गैरवापर करून देशाच्या युवा पिढीला अमली पदार्थांच्या विळख्यात अडकवणाऱ्या तस्करांवर केंद्रीय यंत्रणांनी मोठी कारवाई केली आहे. केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी केंद्रीय तपास यंत्रणा तसेच आसाम, मिझोराम आणि मणिपूर पोलिसांच्या संयुक्त आणि यशस्वी कारवाईचे कौतुक केले असून, भारताच्या तरुणाईशी खेळणाऱ्या कोणत्याही टोळीला सोडले जाणार नाही, असा कडक इशारा दिला आहे.

केंद्रातील मोदी सरकारच्या अमली पदार्थविरोधी 'झिरो टॉलरन्स' धोरणांतर्गत 'ऑपरेशन ट्रायडंट' राबविण्यात आले आहे. याद्वारे आंतरराष्ट्रीय नार्को-कार्टेलला मोठा धक्का देण्यात आला आहे. २३ ऑक्टोबर रोजी केंद्रीय सुरक्षा यंत्रणा आणि राज्य पोलिसांनी संयुक्त मोहिमेत आसाम, मिझोराम आणि मणिपूरमधील ३८ वेगवेगळ्या ठिकाणी एकाच वेळी जोरदार छापेमारी करून तस्करांचे संपूर्ण जाळे उद्ध्वस्त केले आहे. ३१ डिसेंबर २०२९ पर्यंत देशातील अमली पदार्थांच्या संपूर्ण नेटवर्कचे मुळापासून उच्चाटन करण्याच्या भारत सरकारच्या दृढ संकल्पाचा हा एक भाग आहे. नार्को-कार्टेलचा पूर्णपणे नायनाट होईपर्यंत अशाच प्रकारच्या कठोर कारवाया सुरूच राहतील, असा स्पष्ट संदेश सरकारने दिला आहे.

# बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ घोंघावणार! २८ ऑक्टोबर रोजी आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता



**हैद्राबाद (प्रतिनिधी)**– भारतीय हवामान विभागाने आंध्र प्रदेश आणि ओडिशाच्या किनारपट्टी भागांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्राचे आता डिप्रेशनमध्ये रूपांतर झाले असून त्याची तीव्रता आणखी वाढून त्याचे अति तीव्र चक्रीवादळात रूपांतर होऊ शकते. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, हे वादळ २८ ऑक्टोबर रोजी आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर धडकणार आहे. वाऱ्याचा वेग ताशी ११५ ते १२५ किलोमीटरपर्यंत पोहोचू शकतो, तर अधूनमधून वाऱ्याचे झोत तशी १४० किलोमीटरपर्यंत जाण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती किनारपट्टीवरील रहिवाशांसाठी चिंतेचा विषय आहे, कारण यामुळे मुसळधार पाऊस, सोसाट्याचा वारा आणि समुद्रात उंच लाटा येण्याची शक्यता आहे.

२४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता बंगालच्या उपसागराच्या पूर्व मध्य आणि लगतच्या आग्नेय भागावरील कमी दाबाचे क्षेत्र तीव्र होऊन त्याचे अवदाबमध्ये रूपांतर झाले.ते अंदमान बेटांमधील श्री विजयपूरमच्या वायव्येस सुमारे ५१० किमी, विशाखापट्टणमच्या पूर्व आग्नेयेस ८२० किमी, काकीनाडापासून ९१० किमी, मच्चीपट्टणमपासून १०२० किमी आणि बापटलाच्या पूर्वेस ११०० किमी अंतरावर स्थित होते.

हवामान शास्त्रज्ञांच्या मते, हे कमी दाबाचे क्षेत्र प्रथम दक्षिणेकडे सरकेल आणि तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतरित होईल. २५ ऑक्टोबर रोजी ते पूर्व मध्य आणि आग्नेय बंगालच्या उपसागरावरून पश्चिम-वायव्य दिशेकडे वळेल. २६ ऑक्टोबरच्या सकाळपर्यंत त्याचे चक्रीवादळात रूपांतर होईल. २७ ऑक्टोबरच्या सकाळपर्यंत पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरावर त्याचे तीव्र चक्रीवादळात रूपांतर होईल. त्यानंतर ते वायव्य दिशेने सरकेल, अति तीव्र चक्रीवादळात रूपांतरित होऊन २८ ऑक्टोबरच्या सकाळी आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर पोहोचेल.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, हे अति तीव्र चक्रीवादळ २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास आंध्र प्रदेश आणि यानमच्या किनारपट्टीवर बापटला आणि विशाखापट्टणम दरम्यान धडकण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा कमाल वेग ताशी ११५-१२५ किमी राहण्याची शक्यता असून वाऱ्याच्या झोतांचा वेग ताशी १४० किमी पर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. अशा वादळामुळे किनारपट्टीच्या भागांमध्ये सोसाट्याचा वारा, मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस आणि समुद्रात उंच लाटा येतील. सखल भागांमध्ये पूर येण्याचा धोका वाढेल. शेतीची

## टी.सी. हरवली

माझी हमीद पीरसाब या नावाची इयत्ता नवी पासची टी.सी. मुखेडनांदेड प्रवासादरम्यान हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा

– संपर्क पत्ता–
हमीद पीरसाब
रा . खाटीक गल्ली, मुखेड,
जि. नांदेड.

# बीएसएफकडून ४ पाकिस्तानी मासेमार जेरबंद

**कच्छ (वृत्तसंस्था)**– भारत-पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमेवर सुरक्षा यंत्रणांनी मोठी धडक कारवाई केली आहे. गुजरातच्या कच्छ जिल्ह्याला लागून असलेल्या अत्यंत संवेदनशील सर क्रीकच्या दलदलीच्या प्रदेशातून भारतीय हद्दीत बेकायदा प्रवेश करणाऱ्या ४ पाकिस्तानी मासेमारांना सीमा सुरक्षा दलाने ताब्यात घेतले आहे. या कारवाईदरम्यान जवानांनी त्यांची एक मासेमारी नौकाही जप्त केली असून, या घटनेमुळे सीमावर्ती भागात एकच खळबळ उडाली आहे. गुप्तचर यंत्रणांच्या विशेष माहितीच्या आधारे हा सापळा रचण्यात आला होता.

रविवारी सर क्रीक परिसरातील दलदलीच्या भागात खेकडे पकडण्याच्या बहाण्याने हे पाकिस्तानी मासेमार भारतीय जलक्षेत्रात दाखल झाले होते. बीएसएफच्या माहितीनुसार, ताब्यात घेण्यात आलेल्या मासेमारांची नावे कादिर थैमोर, मुहम्मद मूसा, असगर थैमोर आणि अहसान जट अशी आहेत. हे चौघेही पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील 'चाच जान खान' गावाचे रहिवासी आहेत. सध्या सुरक्षा यंत्रणांकडून त्यांची कसून चौकशी सुरू आहे.

## जाहीर प्रगटन

**गुरु रविदास महिला सहकारी पतसंस्था मर्या. नांदेड ता. जि. नांदेड** या संस्थेच्या सर्व सभासद/मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणुक सन २०२६-२०३१ या कालावधीचा निवडणुक कार्यक्रम दिनांक २६/१०/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत असुन उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कालावधी दिनांक २७/१०/२०२६ ते ०२/११/२०२६ आहे. प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक ०३/११/२०२६ रोजी करण्यात येणार असुन वैध नामनिर्देशन पत्राची यादी दि. ०४/११/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी दिनांक ०४/११/२०२६ ते १८/११/२०२६ आहे. निवडणुक लढविणा-या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतीम यादी प्रसिध्दी दिनांक १९/११/२०२६ करण्यात येणार आहे. आवश्यकता असल्यास मतदान दिनांक २९/११/२०२६ रोजी घेण्यात येणार असुन मतदान संपल्यानंतर लगेच मतमोजणी करण्यात येणार आहे. व निकाल जाहीर करण्यात येणार आहे संस्थेच्या निवडणुकीचा निवडणुक कार्यक्रम संस्थेच्या व उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयाचे नोटीस बार्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे यांची सर्व सभासद/मतदारांना नोंद घ्यावी.

निवडणुक निर्णय अधिकारी
गुरु रविदास महिला सहकारी पतसंस्था मर्या. नांदेड
ता. जि. नांदेड.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, स्थित मौजे वाडी (बु.) ता.जि. नांदेड येथील शेत सर्वे नं. २५/ब/४ पैकी एक प्लॉट ज्याचा प्लॉट नं. ०७ आहे. ज्याची गुंठेवारी झालेली आहे.
ज्याचे एकूण क्षेत्रफळ (३६.६३३) १२०३.६९ चौरस फूट म्हणजेच १११.८६ चौ.मीटर आहे.
ज्याची चर्तुः सिमा पुर्वेस : प्रकाश देवराव यांचे शेत आहे,
पश्चिमेस : ७.६२ मीटर रुंद रस्ता आहे ,
दक्षीणेस : प्लॉट नं. ८ आहे व
उत्तरेस : प्लॉट नंबर ६ आहे.
जे बालाजी धोंडीबा शिंदे वय : ५८ वर्षे धंधा: व्यापार, रा. ज्ञानेश्वर नगर, सिडको नांदेड ता.जि. नांदेड यांच्या नावे असलेला प्लॉट
हा प्लॉट त्यांच्याकडून माझे पक्षकार
१) शिवम अशोक कदम वय: २१ वर्षे रा. नागापुर ता. भोकर जि. नांदेड
२) अनिल संभाजी पवार वय: ३३ वर्षे रा. भोकर ता. भोकर जि. नांदेड
३) साईराज संतोष कवळे वय: २४ वर्षे रा. सिंधी ता. उमरी जि. नांदेड
४) तुकाराम गंगाधर पुयड वय: ४६ वर्षे रा. सिंधी ता. उमरी जि. नांदेड
५) अमर मुंजाजी काळे वय २५ वर्षे रा. मरडसगाव ता. गंगाखेड जि. परभणी
हे प्लॉट खरेदी करण्याचा करार केला असुन बयाना रक्कमेपोटी माझे पक्षकारांनी बालाजी धोंडीबा शिंदे यांना काही रक्कम दिली असुन, उर्वरित रक्कम खरेदीखताच्या वेळी देऊन त्यांच्याकडून माझे पक्षकार नोंदणीकृत खरेदीखत हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत करुन घेण्याचे ठरले आहे.
तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, वरील वर्णनाच्या मालमत्तेमध्ये कुणाचा काही हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन (०८) दिवसाच्या आत मुळ कागदपत्र व ईतर पुराव्यासह आमच्याकडे लेखी आक्षेप दाखल करावा व वरील मुदतीत कुणाचा काही आक्षेप किंवा उजर नाही आल्यास माझे पक्षकार वरील मालमत्तेचे खरेदीखत त्यांच्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर कुणाचा काही आक्षेप किंवा उजर आल्यास त्याची जबाबदारी माझ्या पक्षकारांची राहणार नाही. करिता सबब हे जाहीर प्रगटन देत आहोत.

**जाहीर प्रगटन देणार**
**वरील सर्व प्लॉट घेणार**
**मो.नं. ९१८६६८६२९६५०**


॥ ੧ੴ ਸਤਿਗੁਰ ਪ੍ਰਸਾਦਿ॥ ॥

ਸਤਿਨਾਮੁ — ਵਾਹਿਗੁਰੂ

आपि सहाई होआ । सचे दा सचा ढोआ ॥
जनु नानकु धूड़ि मंगै तिसु गुरसिख की जो आपि जपै अवरह नामु जपावै ॥


संत बाबा दलीप सिंघ जी


संत बाबा जीवन सिंघ जी


संत बाबा हरी सिंघ जी


संत बाबा शीशा सिंघ जी

# सालाना बरसी

मानयोग गुरू प्यारी साध संगत जी!

वाहिगुरू जी का खालसा, वाहिगुरू जी की फतहि।
बेनती है कि हर साल की तरह इस साल भी

**सचखंडवासी श्रीमान संत बाबा दलीप सिंघ जी**
की 56 वीं सालाना बरसी
**सचखंडवासी श्रीमान संत बाबा जीवन सिंघ जी**
की 52 वीं सालाना बरसी
**सचखंडवासी श्रीमान संत बाबा हरी सिंघ जी**
की 44 वीं सालाना बरसी तथा
**सचखंडवासी श्रीमान संत बाबा शीशा सिंघ जी कारसेवा वाले**
की 21 वीं सालाना बरसी

दिनांक 27, 28, 29 अकटूबर 2026 ई. को गुरूद्वारा नानकसर साहिब श्री हजूर साहिब जी नांदेड़ में बड़ी श्रद्धा भावना से मनाई जाएगी। 27 अकटूबर 2026 दिन मंगलवार को श्री अखंड पाठ आरंभ होंगे और 29 अकटूबर 2026 दिन गुरुवार को पाठ की समाप्ति होगी। इस शुभ अवसर पर संत महापुरुष, बड़े-बड़े गुणी-ज्ञानी और रागी सज्जन कीर्तन और अपने प्रवचनों द्वारा संगत को निहाल करेंगे। अतः आप जत्थे समेत तथा सपरिवार दर्शन देकर गुरु महाराज जी की खुशीयाँ प्राप्त करें। उपरांत गुरू का लंगर अटूट बरतेगा।


संत बाबा नरिंदर सिंघ जी
9890012201, 9890012202

गुरु पंथ के दास -
संत बाबा नरिंदर सिंघ जी
संत बाबा बलविंदर सिंघ जी
(कार सेवा वाले)
**गुरुद्वारा नानकसर साहिब**
डाकः विष्णुपुरी, नांदेड़-431606 (महाराष्ट्र) 9403131313
Please visit us : www.nanaksarsahib.org e-mail : info@nanaksarsahib.org


संत बाबा बलविंदर सिंघ जी
9860748888, 9823164483

Reliance@9370096273

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ७७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# २.३५ लाखांचा गांजा जप्त; स्ट्रीट सेफ्टी व भाग्यनगर पोलिसांची संयुक्त कारवाई, दोघे रंगेहात अटकेत

## शेतातून फांद्या तोडून विक्रीसाठी नेत होते; ४ किलो ७१० ग्रॅम ओला गांजा हस्तगत

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात अवैध अंमली पदार्थांची वाहतूक व विक्री करणाऱ्यांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या स्ट्रीट सेफ्टी पथकाने आणि भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने संयुक्त कारवाई करत जय भवानी चौक परिसरातून २ लाख ३५ हजार ५०० रुपये किमतीचा ४ किलो ७१० ग्रॅम ओला गांजा जप्त केला आहे. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.

शनिवार, दि. २४ ऑक्टोबरच्या रात्री भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे शोध पथकाचे पोउपनि विनोद देशमुख हे पथकासह पेट्रोलिंगवर होते. दि. २५ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास स्ट्रीट सेफ्टी पथकाचे प्रमुख सपोनि नृसिंह पोमनाळकर यांनी माहिती दिली की, जय भवानी चौक येथे दोन संशयित इसम चोरट्या विक्रीच्या उद्देशाने गांजाच्या झाडाच्या फांद्यांची मोळी घेऊन जात



आहेत.

मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्याकडून कारवाईची परवानगी घेण्यात आली. त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने आणि भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली एनडीपीएस कायद्याच्या तरतुदींचे पालन करत शासकीय व खाजगी पंच, वजन काटेवाले, फोटोग्राफर आणि फॉरेन्सिक टीम यांना पाचारण करण्यात आले.

राजपत्रित अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या उपस्थितीत पंचांसमक्ष दोघांची झडती घेण्यात आली. पोलिसांनी तुकाराम रुस्तुमराव पावडे (वय ५०, व्यवसाय शेती, रा. वाडी बु., ता. जि. नांदेड), रुक्मण नरसिंग वायवळे (वय ५१, व्यवसाय मजुरी, रा. इंदिरानगर, नवी वाडी, नांदेड) या दोघांना अटक केली. यांना एनडीपीएस कायद्यातील तरतुदीनुसार त्यांच्या हक्कांची लेखी व तोंडी समज देऊन झडती घेतली असता त्यांच्याकडे उग्र वास येणाऱ्या व हिरवी ओलसर पाने असलेल्या गांजाच्या फांद्यांची पांढऱ्या दोरीने बांधलेली मोळी आढळून आली. फॉरेन्सिक टीमने तो गांजाच असल्याची खात्री केली.

सदर मुद्देमाल ४ किलो ७१० ग्रॅम (प्रति किलो ५० हजार रुपये दराप्रमाणे) एकूण २ लाख ३५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जागीच सील करून पंचनाम्याद्वारे जप्त करण्यात आला. प्राथमिक चौकशीत आरोपी तुकाराम पावडे याने कबुली दिली की, त्याने व रुक्मण वायवळे याने मिळून आर्थिक फायद्यासाठी स्वतःच्या प्लॉटिंगमधील गांजाच्या झाडाच्या फांद्या तोडून विक्रीसाठी नेत होते. याप्रकरणी पोउपनि विनोद देशमुख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपींविरुद्ध गु.र.नं. ६१८/२०२६ कलम ८(क), २०(ब)(ii)(ब) आणि २९ एनडीपीएस ॲक्टप्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनाखाली भाग्यनगरचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे, पोउपनि विनोद देशमुख, संकेत सवराते पाटील अंमलदार चवरे, बसमतकर, कांबळे, बालाजी चन्ने, मुंढे, गवाले आणि स्ट्रीट सेफ्टी पथकाचे सपोनि नृसिंह पोमनाळकर, अंमलदार अमलापुरे, हाक्के यांनी संयुक्तपणे पार पाडली.

# आसना गार्डन श्रमदानाला उत्स्फूर्त प्रतिसाद; अवघ्या दीड तासात गार्डन चकाचक

**नांदेड (प्रतिनिधी)–** सामाजिक बांधिलकी आणि स्वच्छतेचा संदेश प्रत्यक्ष कृतीत उतरवत, 'आसना मॉर्निंग वॉक ग्रुपच्या वतीने आसना गार्डन परिसरात स्वच्छता व श्रमदान मोहीम उत्साहात पार पडली. आसना मॉर्निंग वॉक ग्रुपचे आनंद कल्याणकर यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत शेकडो नांदेडकरांनी एकत्र येऊन अवघ्या दीड तासात तब्बल पावणेदोन किलोमीटर लांबीचा संपूर्ण परिसर चकाचक केला. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, आमदार बालाजी कल्याणकर यांनीही या कार्याची दखल घेत आसना गार्डनच्या विकासकामासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली आहे.

आनंद कल्याणकर यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमाची सुरुवात रविवारी सकाळी ६ वाजता संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व राष्ट्रगीताने झाली. कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमदानाचे चोख नियोजन करण्यात आले होते. सहभागी नागरिकांना प्रत्यक्ष हॅन्डग्लोव्हज, पोती व कॅरिबॅगचे वाटप करण्यात आले. कामाची योग्य विभागणी व्हावी यासाठी प्रत्येकी १२ जणांचे वेगवेगळे गट तयार करण्यात



आले होते. सुमारे पावणेदोन किलोमीटर लांब आणि ४० मीटर रुंद परिसरातील प्लास्टिक पिशव्या, रिकाम्या बाटल्या, पाकिटे व कचरा वेचून थेट घंटागाडीत जमा करण्यात आला. तसेच उपस्थित नागरिकांची रीतसर नोंद नोंदवहीत घेण्यात आली. यावेळी ज्येष्ठ नागरिकांचा प्रातिनिधिक सत्कार करून त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यात आला.

आसना गार्डन परिसराच्या कायापालटानंतर बोलताना अध्यक्ष आनंद कल्याणकर म्हणाले की, नागरिकांचे आरोग्य आणि पर्यावरण संवर्धन या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत. ग्रुपच्या केवळ एका आवाहनावर शेकडो मॉर्निंग वॉकर्स व नांदेडकरांनी सुट्टीच्या दिवशी सकाळी एकत्र येऊन श्रमदान केले. या एकजुटीच्या जोरावरच एवढा मोठा परिसर अवघ्या दीड तासात पूर्णपणे स्वच्छ करता आला. याचे सर्व श्रेय मॉर्निंग वॉकर्स आणि पर्यावरणप्रेमींना जाते.

या श्रमदान मोहिमेदरम्यान नांदेड उत्तरचे आमदार बालाजी कल्याणकर यांनी प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी आनंद कल्याणकर, डॉ. भगवानराव मनूरकर यांनी आमदारांना आसना गार्डन परिसरातील विविध समस्या, पाण्याची टंचाई आणि आवश्यक उपाययोजना यांची सविस्तर माहिती दिली.

यावेळी आ. बालाजी कल्याणकर यांनी तत्काळ प्रतिसाद देत उद्यानासाठी स्वतःकडून बोअरवेल मंजूर करण्याचे जाहीर केले. तसेच १ नोव्हेंबर रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नांदेड दौर्यावर येत असून, आनंद कल्याणकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाची उपमुख्यमंत्र्यांसोबत बैठक घडवून आणू आणि शासनाकडून गार्डनच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून देऊ, असा शब्द आमदार कल्याणकर यांनी दिला.

# लातूरमध्ये डीआयजी पथकाची जुगार अड्ड्यावर धाड; १३ जणांविरुद्ध कारवाई, ११ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** परिक्षेत्रात अवैध व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी थेट आपले विशेष पथक लातूर जिल्ह्यात रवाना केले होते. या पथकाने निलंगा पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुगार अड्ड्यावर धाड टाकून १३ इसमांविरुद्ध कारवाई करत ११ लाख रुपयांपेक्षा अधिकचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. २५ ऑक्टोबर रोजी निलंगा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बँक कॉलनी येथे विठ्ठल वाघमोडे यांच्या पत्र्याच्या शेडसमोर तिर्रट नावाचा जुगार खेळ सुरू असल्याची माहिती पथकाला मिळाली. पथकाने तत्काळ छापा मारून कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी ४३ हजार ६५० रुपयांची रोख रक्कम, १३



मोबाईल फोन आणि १० मोटारसायकली असा एकूण ११ हजार २ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी १३ इसमांविरुद्ध निलंगा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३७८/२०२६ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह हवालदार प्रदीप खानसोळे, हवालदार गणेश राठोड, हवालदार संदीप वाघाडे आणि गजानन डवरे यांनी पार पाडली. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकाचे अभिनंदन केले आहे.

# गुरुद्वारा नानकसर साहिब येथे सालाना बरसीचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील गुरुद्वारा नानकसर साहिब, हजूर साहिब नांदेड येथे मोठ्या श्रद्धा आणि भावनेने सालाना बरसी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



दरवर्षी प्रमाणे याही वर्षी संत बाबा दलीपसिंग यांची ५६ वी, संत बाबा जीवनसिंग यांची ५२ वी, संत बाबा हरीसिंग यांची ४४ वी आणि संत बाबा शीशासिंग कारसेवावाले यांची २१ वी सालाना बरसी दिनांक २७, २८, २९ ऑक्टोबर २०२६ रोजी गुरुद्वारा नानकसर साहिब, हजूर साहिब नांदेड येथे मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे.

या सोहळ्याची सुरुवात मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी श्री अखंड पाठ आरंभाने होणार असून, गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी पाठाची समाप्ती होईल.

या प्रसंगी कीर्तन, भजन, प्रवचन होणार आहेत. हा कार्यक्रम संत बाबा नरिंदरसिंग आणि संत बाबा बलविंदरसिंग (कार सेवावाले) यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे.

इकडचं तिकडचं

# मताला भाव फुटला अन् लोकशाहीचा भाव उतरला!

गावाकडच्या पारावर चार माणसं बसली होती. चहाचे घोट घेत राजकारणाच्या गप्पा सुरू होत्या. तेवढ्यात एकजण म्हणाला, "आरं, पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत मताला भाव लागल्याच्या चर्चा ऐकायला मिळतायत. ही निवडणूक हाय की, गुरांच्या बाजारातली खरेदी–विक्री?" दुसरा लगेच म्हणाला, "आरं बाबा, गुरांच्या बाजारात तरी जनावराची जात अन् दात बघून भाव ठरतो. इथं तर पदवीधराच्या शिक्षणापेक्षा त्याच्या मताला किती नोटा मिळतात, याचीच चर्चा!"

एक म्हातारा मिशीला पीळ देत म्हणाला, "मंग एवढं शिकायचं कशाला? पदवी भिंतीवर लावायची अन् विवेक कपाटात कोंडून ठेवायचा का?" बोलणं ऐकून सगळे हसले; पण त्या हसण्यात लोकशाहीची काळजी दडलेली होती. पदवीधर मतदार म्हणजे सुशिक्षित माणूस, शिक्षक म्हणजे समाजाला दिशा देणारा घटक. मग याच निवडणुकांत पैशांच्या आमिषाची चर्चा व्हावी, ही चिंतेची बाब न्हाई का?

"आरं, मत विकत घेता येत असेल, तर लोकशाहीचा बाजार भरतो; पण त्या बाजारात जनतेचा विश्वास स्वस्तात विकला जातो!"

एकानं सवाल केला, "आज मतासाठी नोट घेतली, तर उद्या निवडून आलेल्या माणसानं जनतेसाठी काम करायचं की खर्च केलेल्या पैशांचा हिशोब वसूल करायचा?"

"खरंच, मतदारानं घेतलेली नोट काही दिवसांत खर्च होईल; पण चुकीच्या प्रतिनिधित्वाचा परिणाम वर्षानुवर्षं भोगावा लागू शकतो."

नोट हातात येते काही क्षणांसाठी, पण मताचा परिणाम भोगावा लागू शकतो वर्षानुवर्षं! निवडणुकीत प्रचारासाठी पैसा खर्च करणं आणि मताच्या बदल्यात पैसा देणं, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. मतदाराला विचार पटवून देणं हा प्रचार; पण पैशाच्या आमिषानं त्याच्या निर्णयावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणं हा लोकशाहीच्या मूल्यांसमोरचा प्रश्न आहे.

पक्ष कोणताही असो, उमेदवार कुणीही असो; मतदाराच्या विवेकाचा आणि मतदानाच्या स्वातंत्र्याचा आदर झालाच पाहिजे.

शेवटी पारावरच्या त्या म्हाताऱ्यानं एकच वाक्य टाकलं, "आरं, नोटा मोजण्यापेक्षा जनतेच्या प्रश्नांची उत्तरं द्या. पैशाच्या गड्डीपेक्षा कामाचा हिशोब मोठा ठेवा. खुर्चीवर बसायचं असेल तर जनतेचा विश्वास जिंकून बसा; मताला भाव लावून न्हाई!" कारण मतदाराची किंमत पैशात ठरू लागली, तर लोकशाहीचा दर्जा कागदावरच उरतो!

**शिवाजीराजे पाटील बाभळीकर**

# विठ्ठलराव सिनगारे यांचे निधन

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** शहरातील महात्मा ज्योतिबा फुले नगरामधील ज्येष्ठ नागरिक, सेवानिवृत्त कृषी सहायक विठ्ठलराव खोब्राजी सिनगारे (वय ८० वर्षे) यांचे रविवार, दि. २५ रोजी सायंकाळी ७ वा. नांदेड येथे खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले.



सोमवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी स. ११ वा. अर्धापूर येथील माळी समाज स्मशान–भूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, नातू, पणतू असा परिवार आहे.

# दोन दिवसांत आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी आणि दोन खुनाच्या प्रयत्नाचे गुन्हे दाखल; ३ आरोपी अटकेत

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत गेल्या ४८ तासांत तीन गंभीर गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून, ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

भोकर तालुक्यातील दिवशी बु. येथे तुळशीराम लक्ष्मण कदम (वय ४५) यांनी विषारी औषध पिऊन आत्महत्या केली. मयताच्या पत्नी करुणाबाई तुळशीराम कदम (वय ४४) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी मैनोदीन शेख आणि राहुल माधव सोनकांबळे (दोघे रा. भोकर) यांनी ऑटो विक्रीचे उर्वरित ३० हजार रुपये देण्यास टाळाटाळ करून जीवे मारण्याची धमकी देऊन मानसिक त्रास दिला. या त्रासाला कंटाळून त्यांनी आत्महत्या केली.

याप्रकरणी भोकर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५७६/२०२६ कलम १०८, ३५२, ३५१(२)(३), ३(५) BNS सह कलम ३(१)(आर)(एस), ३(२)(व्ही) ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल असून तपास उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश भंडरवार करीत आहेत.

**जुन्या भांडणावरून खंजर–चाकूने हल्ला; बिलालनगरमध्ये ४ जणांवर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा**

मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी बिलालनगर, नांदेड येथे जुन्या भांडणाच्या कारणावरून आरोपी मुन्हसीरुद्दीन सिद्दिकी उर्फ मुन्नू, जवादोद्दीन सिद्दिकी, मुबशिरोद्दीन सिद्दिकी आणि शहजादोद्दीन सिद्दिकी (सर्व रा. बिलालनगर) यांनी संगनमत करून फिर्यादीचा चुलत भाऊ शाहेद मोमीन यास जीवे मारण्याच्या उद्देशाने खंजर, चाकू, काठीने गंभीर जखमी केले.

फिर्यादी मोहम्मद रफिक मोहम्मद युसूफ (वय ३७) यांच्या तक्रारीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. १३८०/२०२६ कलम १०९(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), ३(५) BNS अन्वये गुन्हा दाखल असून तपास सपोनि मुळे करीत आहेत. या गुन्ह्यातील दोन आरोपी ताब्यात असून अटकेची प्रक्रिया सुरू आहे.

**गोकुंद्यात टोळक्याचा तलवारीने हल्ला; किनवटमध्ये १६ जणांविरुद्ध गुन्हा, एकास अटक**

दि. २३ ऑक्टोबर रोजी ठाकरे चौक, गोकुंदा येथील सार्वजनिक रोडवर जुन्या भांडणावरून १६ जणांच्या टोळक्याने फिर्यादी संदीप सोपानराव केंद्रे यास तलवार, चाकू व दगडाने मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला व धमकी दिली.

फिर्यादीवरून किनवट पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३१५/२०२६ कलम १०९(१), १९१(२)(३), १९०, ११५(२), ४९, ६१(२), ३५१(३) BNS सह कलम ४/२५ शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल असून तपास पोउपनि लेनगुळे करीत आहेत.

# किनवटमध्ये डीजेविरोधात कारवाई; मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह चालक–मालकावर गुन्हा दाखल

**किनवट (प्रतिनिधी)–** गोकुंदा येथील शाहूनगर परिसरात नवरात्र विसर्जन मिरवणुकीदरम्यान निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आवाजात डीजे वाजवल्याप्रकरणी पोलिसांनी संबंधित मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी तसेच डीजे चालक व मालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

गोकुंद्याच्या शाहूनगर परिसरातील दुर्गादेवी मंडळाच्या मिरवणुकीत गुरुवार, दि. २२ रोजी सायंकाळी लाल रंगाच्या स्वराज ७४४ एक्सटी ट्रॅक्टरवर बसविलेल्या डीजेचा मोठ्या आवाजात वापर सुरू असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी डेसिबल मीटरद्वारे आवाजाची मोजणी केली असता, ध्वनीची पातळी ७५ डेसिबलपेक्षा अधिक असल्याचे आढळून आले. त्यानंतर डेसिबल मीटरची प्रिंट काढून पंचांसमक्ष पंचनामा करण्यात आला.

याप्रकरणी मंडळाचे अध्यक्ष दीपक नागरगोजे, मंडळाशी संबंधित पदाधिकारी तसेच डीजे चालक व मालक सचिन शिवणकर (रा. किनवट) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमे आणि पर्यावरण संरक्षण व ध्वनी प्रदूषणासंबंधीच्या तरतुदींनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला शिवसेनेची आर्थिक मदत

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील शेतकरी शंकर क्षीरसागर यांनी व्हीडीओ करून टोकाचे पाऊल उचलल्याच्या घटनेनंतर शिवसेना पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन सांत्वनपर भेट घेतली.

या भेटीदरम्यान शिवसेना पदाधिकाऱ्यांनी क्षीरसागर यांच्या कुटुंबियांसोबत संवाद साधून त्यांना धीर दिला. तसेच शिवसेनेच्या वतीने कुटुंबाला आर्थिक सहकार्य करण्यात आले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, युवासेना विभागीय सचिव महेश खेडकर, शिवसेना



तालुकाप्रमुख सुनिल पाटील कदम, उपजिल्हा संघटक माधवराव पांचाळ, माजी जि. प. सदस्य बाळगिर महाराज गिरी, माजी पं. स. सदस्य वसंतराव डुकरे, तालुका संघटक नवनाथ पाटील जोगदंड, उपतालुकाप्रमुख पुरभाजी जाधव पासदगावकर, उपतालुकाप्रमुख हरिभाऊ धुमाळ, मारोतराव कदम, गणेश भोसले, सौरभ देवकते, पावडेवाडी शाखाप्रमुख सुरेश पावडे, दर्यापूर शाखाप्रमुख शिवाजीराव सूर्यवंशी, वाघी शाखाप्रमुख प्रकाशराव जानकर यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रादेशिक उपसंचालकांच्या पत्रावर कार्यवाही नाही- सहायक संचालकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागात माताजी शिक्षण संस्था वाघाळा संचालित आश्रमशाळेतील कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप होत आहे.

प्राप्त माहितीनुसार या आश्रमशाळेतील शिक्षक शेख अब्दुल सत्तार यांच्या मान्यता व नियुक्तीबाबत चौकशी करून अहवाल सादर करणे आणि कारवाई करण्याबाबत प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, लातूर यांनी दि. १४ ऑगस्ट २०२६ आणि दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी पत्राद्वारे सहायक संचालक, नांदेड यांना कळविले होते.

तथापी, अद्याप त्यावर ठोस कार्यवाही झाली नसल्याने या प्रकरणाकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा आहे. या आश्रमशाळेबाबत उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे याचिका क्र. ५८१२/२०२५ आणि ५६८२/२०२५ अन्वये प्रकरणे प्रलंबित असल्याचेही सांगण्यात येत आहे.

दरम्यान, सहायक संचालक सचिन खुणे यांच्या कार्यपद्धतीबाबत काही सामाजिक कार्यकर्त्यांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून शासनाने वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे. यासंदर्भात सहायक संचालक सचिन खुणे यांची प्रतिक्रिया घेण्याचा प्रयत्न केला असता, संपर्क होऊ शकला नाही.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com